


म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : ............
दा. क्र. : २८३४

BVBK-0402834

क्र. 2538 दिनांक


# चंद्रशेखर

चंद्रशेखर

अनिलकथा : १ :

अनिलकथा : १ :
अनिलकथा

शांता ज. शेळके, एम्. ए.

शांता ज. शेळके, एम्. ए.
शांता ज. शेळके

BVBK-0402834

उत्कर्ष प्रकाशन, पुणे-४

उत्कर्ष प्रकाशन, पुणे-४

प्रकाशिका :
सौ. सविता सु. जोशी
उत्कर्ष प्रकाशन
श्री रेणुका अपार्टमेंटस्
शिवाजीनगर, पुणे ४

© लेखकाकडे

मूल्य : रु. दहा फक्त

मुद्रक :
गिरीश जोशी
श्रीपाद ऑफसेट
'शिवकृपा'
१९४/२ सदाशिव पेठ, पुणे- ३०

# बरं कां मुलांनो !

आमच्या ‘अनिल कथां’ पैकीं ‘चंद्रशेखर’ ही पहिली कथा आज मी तुम्हांला वाचावयास देत आहे. ही कथा जरी मी लिहिलेली असली तरी ती कांहीं माझी स्वतःची कथा नव्हे. डेन्मार्कमध्यें ‘ हॅन्स ॲण्डरसन् ’ नांवाचा एक अतिशय थोर व महान् प्रतिभाशाली असा परीकथालेखक होऊन गेला. त्याच्या ‘ फेलो ट्रॅव्हलर्स ’ नामक कथेचें ‘ चंद्रशेखर ’ हें मराठी रूपांतर खास तुमच्यासाठीं म्हणून मी तयार केलें आहे. हॅन्स ॲण्डरसन् हा परीकथांचा केवळ जादूगार होता. त्याला कवीचें कोमल हृदय व चित्रकाराची सौंदर्यप्रेमी दृष्टि लाभलेली होती. आपल्या डोळ्यांना सर्वसामान्य दिसणाऱ्या गोष्टींत ॲण्डरसन्ला गूढ अर्थ भरलेला दिसे. झाडें, फुलें, पांखरें, नद्या, समुद्र इतकेंच काय पण फुलांवरून उडणारे पतंग, वाऱ्यांत थरथरणारीं गवताचीं कोंवळीं पातीं, सायंकाळीं क्षितिजावर दिसणा-

नयनमनोहर रंग, टेकडीवर चमकणारे खडे;—निसर्गातील प्रत्येक सजीवनिर्जीव वस्तु अ‍ॅण्डरसन्‌शीं बोले, त्याच्याशीं हितगुज करी, आणि मग आपल्या कलाकुशल लेखणीनें हीं हितगुजें तो वाचकांना रेखाटून दाखवी. हॅन्स अ‍ॅण्डरसनइतक्या अद्‌भुतरम्य कथा लहान मुलांना दुसऱ्या कुणी क्वचितच सांगितल्या असतील. हॅन्स अ‍ॅण्डरसन्‌इतकें लहान बाळांचें मनोरंजन दुसऱ्या कुणी क्वचितच केलें असेल.

तुम्ही मोठे झालांत म्हणजे अ‍ॅण्डरसन्‌च्या या कथा मूळ इंग्रजींतूनच तुम्ही वाचाल. परंतु तोपर्यंत या महान कथाकाराशीं तुमचा परिचय झालेला असावा म्हणून अ‍ॅण्डरसन्‌च्या सुंदर सुंदर कथा तुमच्यासाठीं मीं मराठींतून सांगणार आहे. 'चंद्रशेखर' ही त्या कथांपैकीं पहिली कथा. ती तुम्हांला आवडली तर आमच्या 'अनिलकथा' मधून अ‍ॅण्डरसनच्या इतरहि मनोरंजक अन् अद्‌भुत कथा वेळोवेळीं मी तुम्हांला वाचावयास देईन.

—शान्ता ज. शेळके.

# चंद्रशेखर

—— : ० : ——

## १ गरीब बिचारा माधव

गरीब बिचारा माधव. तो आज दु:खानें आणि चिंतेनें अगदीं चूर होऊन गेला होता. त्याचे वडील वामनभटजी अत्यंत आजारी होते. आज तर त्यांची अवस्था फारच कठिण झाली होती. आजची रात्र धडपणें पार पडेल असें कांहीं वाटत नव्हतें. माधवला आई नव्हती. दुसरें कोणी जवळचे मित्र किंवा नातेवाईकही नव्हते. त्यामुळें तो एकटाच आपल्या वडलांची शुश्रूषा करीत होता.

वामनभटजी दरिद्री होते. त्यांचें घर म्हणजे एक ठेंगणें दुपाखी खोपट होतें. त्या खोपटांतच एका कोपऱ्यांत वामनभटजींचें अंथरूण घातलेलें होतें. घासलेटचें एक लहानसें डबडें कोपऱ्यांत धूर ओकत उभें होतें. त्याच्या पिवळसर, मिणमिणत्या उजेडांत त्या खोपटांतलें दारिद्र्य अधिकच भेसूर वाटत होतें. वामनभटजींच्या चेहऱ्यावर प्रेतकळा आली होती. मध्यरात्रींचा सुमार झाला होता. बाहेर काळोख दाटला होता. आणि आंत मृत्यूच्या येरझारा चालू होत्या. मध्येंच उघड्या दारांतून वाऱ्याचा झोत येई. दिव्याची ज्योत फडफडे आणि त्यामुळें खोपटांतील वस्तूंच्या काळ्या सावल्या भिंतीवर वेड्या-

बाकड्या नाचूं लागत. तो देखावा पाहून कुणाच्याही हृदयाचा थरकांप झाला असता.

मध्यरात्र उलटली. वामनभटजींच्या जिवाची विलक्षण तगमग होऊं लागली. आपला अंतकाळ जवळ आला हें त्यांनीं ओळखलें. थरथर कांपणाऱ्या हातानें खूण करून माधवला त्यांनीं जवळ बोलावलें व मग क्षीण स्वरांत ते त्याला म्हणाले, " माधव, बाळ, तूं मोठा आज्ञाधारक अन् गुणी मुलगा आहेस. माझी तूं फार चांगली सेवा केलीस. तूं आपल्या कर्तव्याला जागलास. मी तर आतां तुला सोडून चाललों; पण माझ्या पाडसा, भिऊं नकोस. तो दयाळू परमेश्वर सर्वांचा त्राता आहे. तोच तुझा यापुढें सांभाळ करील. या अफाट जगांत आतां तुला एका परमेश्वराखेरीज दुसरें कोणी नाहीं, हें ध्यानांत ठेवून रहा. नीट भलाईनें वाग. सत्य सोडूं नकोस. कोणाचा दुस्वास करूं नकोस. देव तुझें कल्याण करील, तो तुला अंतर देणार नाहीं– "

बोलतां बोलतां वामनभटजींचा आवाज खोल जाऊं लागला. त्यांची जीभ आंत ओढूं लागली. आपल्या क्षीण भेसूर डोळ्यांनीं त्यांनीं माधवच्या गोड चेहऱ्याकडे मोठ्या प्रेमानें अन् वत्सलतेनें निरखून पाहिलें. त्यांचा जीव कासावीस होऊं लागला. जीभ आडवी पडली. " जातों–राम–" एवढे दोनच शब्द कसेबसे त्यांच्या तोंडून बाहेर उमटले. आणि दुसऱ्या क्षणीं त्यांचे प्राण त्यांना सोडून गेले. जिच्यामधून माणसाला कधींहि परत जाग येत नाहीं त्या अखेरच्या झोपेनें वामनभटजींचे डोळे कायमचे मिटून टाकले होते.

वामनभटजींचे प्राण गेल्यावरोबर माधवनें जोरानें हंबरडा फोडला. "बाबा, बाबा, गेलांत ना हो मला सोडून!" असें केविलवाण्या स्वरांत ओरडत तो धाय मोकलून रडूं लागला. गरीब बिचारा माधव. त्याला आई नव्हती, मित्र नव्हते, नातेवाईक नव्हते, प्रेम करायला भावंडेंहि नव्हतीं. एक वडिलांच्या मायेचा पाश होता; तोही आज असा तुटून गेला! या अफाट दुनियेंत माधव आतां एकटा, अगदीं उघड्यावर पडला होता. मग त्याला रडें न कोसळेल तर काय होईल?

मोठमोठ्यानें रडत माधव आपल्या वडिलांच्या बिछान्याशीं गुडघे टेकून बसला. वामनभटजींचे काल्यासारखे थंडगार पडलेले हात उचलून ते त्यानें आपल्या ओठांशीं नेले. वडिलांच्या मायेच्या, वात्सल्याच्या, प्रेमळपणाच्या अनन्त आठवणी त्याच्या मनांत उचंबळून आल्या आणि त्याचा शोक दुणावला.

पित्याचे हात हातीं घेऊन कितीतरी वेळ माधव हमसाहमशीं रडत होता. त्याची समजूत घालायला सुद्धां त्यावेळीं तेथे कोणी नव्हतें. अखेर शेवटीं रडतां रडतां माधव थकून गेला. त्यानें वडलांच्या बिछान्यावरच आपलें मस्तक टेकलें. त्याचे डोळे हळूहळू पेंगुळले आणि रडण्याच्या श्रमामुळें शेवटीं त्याला तेथेंच गाढ झोंप लागली.

त्या झोपेंत माधवला एक सुंदर स्वप्न पडलें. त्यानें पाहिलें तों त्याच्या पुढ्यांत चंद्रसूर्य तळपत होते. त्यांच्या झगमगित प्रकाशांत माधवचे वडील वामनभटजी उभे होते आणि माधवकडे बघून ते प्रेमानें हंसत होते. यावेळीं ते दुखण्यानें खंगलेले नव्हते. म्हातारपणानें जर्जर झालेले नव्हते. उलट ते पूर्णपणें निरोगी, उल्लसित आणि आनंदी

दिसत होते. त्यांचे डोळे हर्षानें चमकत होते आणि त्यांच्या ओठा-वर गोड हंसुं खेळत होतें.

तितक्यात—त्या स्वप्नांतच—आणखी एक चमत्कार घडून आला. एक अत्यंत लावण्यसंपन्न तरुण मुलगी माधवच्या पुढ्यांत येऊन उभी राहिली. तिच्या मस्तकावर हिरेजडित सोनेरी मुकुट लखलखत होता. तिचे काळेभोर कुरळे, रेश्मासारखे मऊ केस तिच्या दोन्ही खांद्यावरून आणि पाठीवरून खालीं रुळत होते. चांदण्यासारखें शुभ्र वस्त्र ती नेसली होती आणि अमावास्येच्या रात्रीसारखी काळीभोर किनखापी चोळी तिनें आपल्या अंगांत घातली होती. माधवकडे पाहून तिनें मधुर हास्य केलें तेव्हां जाईजुईचीं कोंवळीं सुकुमार फुलें आपल्या अंगावर सांडत आहेत असा माधवला भास झाला आणि तो आनं-दानें रोमांचित झाला. मग त्या सुंदर मुलीचा हात माधवाच्या हातांत देत त्याचे वडील गंभीर पण प्रेमळ स्वरांत म्हणाले, " ही बघ माधव तुझी नवरी ! किती सुंदर अन् गुणी मुलगी आहे ही ! हिच्या सौंदर्याला त्रिभुवनांत कुठें जोड नाहीं—"

—त्याच क्षणीं माधवला जाग आली. त्याच्या डोळ्यापुढें तरंगणारें गोड, वैभवशाली स्वप्न झरझर वितळून, विरघळून गेलें. त्यानें आजू-बाजूला पाहिलें तों बाहेर रातकिडे किरकिरत होते; घासलेटची चिमणी विझून जाऊन सगळीकडे काळोख पसरला होता. जवळच्या फाटक्या बिछान्यावर वामनभटजींचा थंडगार मृत देह पडला होता. आणि जवळपास दुसरें कुणीहि नव्हतें ! माधवची छाती भयानें धडधडूं लागली. आणि त्याला पुन्हा रडण्याचा उमाळा आला. गरीब बिचारा माधव !

2038.

## २ अफाट दुनियेंत

दुसरें दिवशीं सकाळीं आसपासची चार शेजारी मंडळी जमली आणि त्यांनीं माधवच्या वडिलांची अखेरची तयारी केली. वामनभटजींचें प्रेत तिरडीवर बांधून त्यांनीं स्मशानाकडे चालवलें तेव्हां माधवही रडत रडत त्यांच्या पाठोपाठ निघाला. लोक त्याचें परोपरीनें सांत्वन करीत होते. पण त्याला आपला शोक आवरत नव्हता.

स्मशानामध्यें माधवच्या हस्तें त्याच्या वडिलांच्या प्रेताला अग्नि देण्यांत आला. लौकरच चिता धडाडली आणि तिच्या तांबड्यालाल ज्वालांत वामनभटजींचा देह झांकून गेला. त्यावेळीं शोकानें आपलें हृदय फुटून जाईल कीं काय असें माधवला वाटलें.

चिता शांतपणें जळत होती. लोक गंभीर चेहरे करून चितेभोंवतीं उभे होते. भटजी मंत्र म्हणत होते. त्या मंत्रांचे शब्द व स्वर परस्परांत असे कांहीं गोडपणें मिसळले होते, कीं ते ऐकून माधवच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. ते अश्रु त्याच्या गालावरून घळघळा खालीं ओघळले. बराच वेळ अशीं आंसवें गाळल्यानंतर माधवचें भारावलेलें मन जरा हलकें झालें. त्याच्या दु:खाची तीव्रता कमी झाली. हळूहळू पावलें टाकीत तो घरीं निघून गेला.

दुसरें दिवशीं सकाळीं माधव पुन्हां स्मशानांत आला. आपल्या वडिलांचें ज्या ठिकाणीं दहन झालें त्या जागेवर एक सुंदरशी समाधि बांधून ठेवावी असा त्याचा बेत होता, पण त्यानें पाहिलें तों आधींच तेथें एक समाधि कुणीतरी बांधली होती इतकेंच नव्हे तर तीवर

ताज्या फुलांचा हारहि कुणी आणून वाहिलेला दिसत होता. माधव क्षण-भर विस्मयचकित झाला पण लगेच सारें कोडें त्याला उलगडलें. गांवकरी मंडळींचा वामनभटजींवर फार लोभ होता. त्यांच्यापैकींच कुणीतरी ही समाधि बांधलेली असावी हें उघड होतें. माधवच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचीं दोन आंसवें ओघळलीं. वडिलांच्या समाधीला वंदन करून तो घरीं परतला.

पण त्या घरांत माधवला आतां बिलकूल चैन पडेना. पावलोंपावलीं त्याला आपल्या वडिलांची आठवण येई आणि मग त्याचा जीव दुःखानें तडफडूं लागे. अखेर शेवटीं तें घर, तें गांव सोडून कुठें तरी दूर दूर प्रवासाला जावें असें त्यानें आपल्या मनाशीं ठरवलें. एका लहानशा गाठोड्यांत त्यानें आपले कपडे व कांहीं जरूरीचे जिन्नसपान्नस बांधून घेतले. त्याच्या वडिलांनीं त्याच्यासाठीं सुमारें शंभर रुपये आणि कांहीं चवल्या पावल्या एका लहानशा पितळी डब्यांत ठेवून दिल्या होत्या. ती त्यांची साऱ्या आयुष्याची कमाई होती. माधवनें ते पैसे एका कशांत ओतून घेतले व तो कसा त्यानें आपल्या कमरेभोंवतीं घट्ट बांधला. नंतर पाठीशी तें गाठोडें घेऊन अश्रुपूर्ण डोळ्यांनीं माधवनें आपलें घर सोडलें. अफाट दुनियेच्या प्रवासाला तो निघाला.

पण तें गांव सोडण्यापूर्वी प्रथम तो स्मशानांत गेला. तेथें त्यानें आपल्या वडलांच्या समाधीला भक्तिभावानें नमस्कार केला. आणि दोन्ही हात जोडून, डोळ्यांतून घळघळां आंसवें गाळीत, भरल्या गळ्यानें तो पुटपुटला, " बाबा, मी नशीबाची परीक्षा बघण्यासाठीं जगाच्या

प्रवासाला चाललों आहे. मी नेहमीं चांगला वागेन. तुम्हीं दिलेली शिकवण मी कधीं विसरणार नाहीं. मला तुम्हीं आपला आशीर्वाद द्या आणि मजवर तुमची मायापांखर नेहमीं असूं द्या. जातों मी."

अशा रीतीनें माधव प्रवासास निघाला. गांव सोडल्यानंतर तो एका चिमुकल्या पाऊलवाटेनें चालूं लागला. किती सुंदर ती वाट. तिच्या दोन्ही बाजूंना कोंवळें पोपटी गवत दाट उगवलें होतें. वाऱ्याच्या मंद झुळकांनीं तें डोलत होतें. त्या गवतावर चिमुकलीं रानफुलें उमललीं होतीं. सोनेरी, लखलखीत उन्हांत त्या फुलांचे निळेजांभळे रंग किती आल्हाददायक वाटत होते! आजूबाजूला अफाट हिरवे माळ पसरले होते. वर गर्द निळें आभाळ हंसत होतें. वारा मंद मंद वाहत होता. त्या वाऱ्याबरोबर तीं चिमुकलीं रानफुलें एकसारखीं डुलत होतीं. जणूं कांहीं आपल्या माना हलवून तीं माधवला म्हणत होतीं, "ये माधव, ये. तुला बघून आम्हांला किती आनंद झाला आहे म्हणून सांगूं! आम्ही तुझें मनापासून स्वागत करतों. किती सुंदर आहेत हे हिरवे माळ! हें निळें आभाळ! या वाऱ्याच्या गोड झुळका! तुला नाहीं का आनंद झाला हें सारें पाहून?" आणि खरोखर, तो रमणीय देखावा बघून माधव आपलें दुःख हळूंहळूं विसरत चालला. सारें अफाट जग आपल्यापुढें मोकळें पसरलें आहे या कल्पनेसरशीं त्याच्या मनांत एक नवा जोम, नवा उत्साह निर्माण झाला. या जगांत अनेक नवनवीं सुंदर दृश्यें, अनेक अद्भुतरम्य देखावे आपणांस बघावयास मिळतील या विचारानें त्याच्या अंगावर हर्षाचे रोमांच उभे राहिले. तो झपझप पावलें टाकूं लागला.

जरा वेळानें ओळखीची पायवाट संपून अनोळखी रस्त्यानें माधव चालूं लागला. हा प्रदेश त्यानें पूर्वी कधीं पाहिलेला नव्हता. वाटेनें जीं खेडीं त्याला लागत तीं त्याच्या ओळखीचीं नव्हतीं. इतकेंच नव्हे तर रस्त्यानें जीं माणसें त्याला भेटत त्यांचे चेहरेही त्याच्या ओळखीचे नव्हते. तो आतां अगदीं परक्या मुलुखांत परक्या माणसांमध्यें येऊन पोहोंचला होता.

आपल्या प्रवासांतली पहिली रात्र. माधवनें उघड्या आभाळाखालीं एका गवताच्या गंजीवर झोंपून काढली. दुसरा कोणताच बिछाना त्याला मिळाला नाहीं. पण त्या गवती बिछान्यावर माधवला जी गाढ झोंप लागली तशी झोप, परांची गादी व रेशमी पलंगपोस घालून सोन्याच्या पलंगावर निजणाऱ्या राजाधिराजाला तरी कधीं मिळत असेल कीं नाहीं शंकाच आहे !

खरोखर, त्या रात्रीं माधवच्या सभोंवतीं जें निसर्गसौंदर्य पसरलें होतें तसें सौंदर्य कुठल्याहि सम्राटाला आपल्या शय्यागृहांत पहा-वयास मिळणें अशक्य होतें. त्या गवताच्या गंजीवर माधव आरामानें पहुडला होता. त्याच्या आजूबाजूंना विस्तीर्ण हिरवेगार माळ पसरले होते. त्यांतून रुपेरी झरे खळखळत होते. आणि माथ्यावर निळ्या आभाळाचें मखमली छत ताणलेलें होतें. कुठल्यातरी राजाला इतकें सुंदर शय्यागृह कधीं मिळालें असेल काय ? माधव तर त्या रात्रीं स्वत:ला राजांचाहि राजा समजत होता तो आज सम्राट् होता. खालीं हिरवीगार धरणी आणि वर निळें निळें आभाळ हें त्याचें शय्यागृह होतें. चिमुकल्या काटेरांच्या फुलांनी

नटलेल्या हिरवळीचा गालिचा त्या शय्यागृहांत अंथरलेला होता. सुंदर पुष्पगुच्छांनीं नटलेलीं ठेंगणीं झुडपें म्हणजे त्या शय्यागृहांत शोभेसाठीं जागजागीं ठेवलेल्या सुरया होत्या. आणि दुतर्फा उगवलेल्या निळ्या लव्हाळ्याखालून झुळझुळ वाहणारे निर्झर हे माधवला झोंप येण्यासाठीं गोड निद्रागीतें गाणारे जणू भाट होते. आभाळाच्या निळ्या छताला चंद्राचा सुंदर बिलोरी दिवा टांगलेला होता, परंतु या दिव्यापासून त्या निळ्या छताला आग लागण्याची काडीमात्र भीति नव्हती. असें तें सुंदर शय्यागृह होतें. माधवला त्या रात्रीं अगदीं गाढ झोंप लागली.

## ३ वादळाची रात्र

दुसरे दिवशी सकाळीं माधव जागा झाला तेव्हां त्याचें शरीर व मन टवटवीत अन् प्रसन्न झालें होतें. त्याच्या अंगांत नवी हुषारी खेळत होती. त्यानें आजूबाजूला पाहिलें तों सूर्य उगवून बराच वर आला होता. त्याच्या कोंवळ्या किरणांनीं गवताच्या पात्यांवरचे दंवाचे थेंब चमकत होते. आणि चिमुकलीं पांखरें उंच सूर लावून गाणीं गात होतीं. जणूं तीं माधवला म्हणत होतीं, " ऊठ माधव, ऊठ. सारं रान जागं झाल्य् ! तूं अजून कसा उठत नाहींस ? "

माधवनें आपला प्रवास पुढें चालूं केला. जरा वेळानें तो पुढच्या एका खेड्यांत जाऊन पोहोंचला. तो सोमवारचा दिवस होता. गांवा-बाहेर शंकराचें देवालय होतें. लोक पूजेसाठीं येत होते. भक्तांनीं वाजविलेल्या घंटांचा घणघणाट वातावरणांत निनादत होता. तो देखावा पाहून माधवचेंही मन भक्तीनें उचंबळून आलें. लोक देवळांत जात होते त्यांच्याबरोबर तोहि गेला. शंकराच्या पिंडीवर बेलफुलें वाहून त्यानें देवाला नमस्कार केला. " जय शंभो ! जय महादेव ! जय पार्वतीपते ! " असा नामघोष चालला होता. माधवनेंहि त्यांत आपला स्वर मिळवला. आपण परक्या ठिकाणीं, परक्या गांवांत, परक्या मंडळीं-मध्यें आहोंत याचा त्याला क्षणभर विसर पडला. त्याला आपलें स्वत:चें खेडेगाव आठवलें. तेथील शंकराचें देवालय आठवलें. आपल्या वडलांबरोबर आपण तेथें जात होतों, देवाला नमस्कार करीत होतों, देवाचा नामघोष करीत होतों, हें आठवलें आणि क्षणभर आपल्या गांवांतच आपण आहोंत या भासानें त्याला बरें वाटलें.

शंकराच्या देवालयापलिकडेच त्या गांवचें स्मशान होतें. तेथें कित्येक समाधी होत्या. त्यांवर धूळ सांठली होती. वाळलेल्या पानांचा पाचोळा पडला होता. कांहींवर सुकलेले हार तसेच लोंबत होते तर कांहीं समाधी भंगून त्यांच्या फटींतून गवत वाढलें होतें. त्या समाधींची ती दुर्दशा बघून माधवला वाईट वाटलें. त्याच्या डोळ्यांत पाणी आलें. "कुणी सांगावें? माझ्या बाबांच्या समाधीची सुद्धां तिकडे अशीच दुर्दशा उडाली असेल. तिच्यावर वाहिलेलीं फुलें अशींच सुकून गेलीं असतील. तिच्यावरही असेंच गवत वाढलें असेल." असें त्याच्या मनांत आलें. मग त्यानें त्या सर्व समाधींवरचा कचरा दूर केला. पाचोळा उडवून लावला. गवत उपटून काढलें. सुकलेले हार काढून ताज्या फुलांचे टवटवीत हार त्यांवर वाहिले. मग त्याच्या मनाला समाधान झालें. तो स्वतःशींच पुटपुटला, "माझ्या वडलांच्या समाधीची सेवा मी करूं शकत नाहीं, म्हणून या समाधींची मी सेवा करतों. न जाणों, मी ज्याप्रमाणें येथें या समाधींची सेवा करीत आहे त्याप्रमाणें तिकडेहि कुणीतरी माझ्या बाबांच्या समाधीची सेवा करीत असेल." आणि त्या कल्पनेनें त्याच्या जिवाला बरें वाटलें.

स्मशानांतून माधव बाहेर पडला तेव्हां दाराशींच एक भिकारी उभा असलेला त्याला दिसला. तो भिकारी लंगडा व अगदीं म्हातारा होता. कांखेंत कुबड्या घेऊन तो मोठ्या कष्टानें कसाबसा एकेक पाऊल टाकीत चालला होता. माधवला त्या भिकाऱ्याची कीव आली. आपल्या कमरेचा कसा सोडून त्यानें सर्व सुट्या चवल्या-पावल्या बाहेर काढल्या आणि त्या त्या भिकाऱ्याच्या पदरांत टाकल्या.

या परोपकाराच्या कृत्यानें त्याच्या मनाची प्रसन्नता अधिकच वाढली. समाधानी अन्तःकरणानें तो पुढें चालूं लागला.

सायंकाळ झाली आणि एकाएकीं आभाळांत काळे ढग दाटून आले. जोराचा वारा वाहूं लागला. विजा कडकडूं लागल्या. आणि प्रचंड वादळ सुरू झालें. माधव झपझप पाय उचलूं लागला. पाऊस पडूं लागण्याच्या आंत कुठें तरी निवारा शोधावा अशी त्याची इच्छा होती. पण कुठें निवाऱ्याची जागा मिळण्यापूर्वींच रात्रींचा काळोख त्याच्याभोंवतीं दाटूं लागला. माधव गोंधळून गेला. आतां काय करावें हें त्याला समजेना. अखेर शेवटीं एका लहानशा टेकडीवर एक छोटेसें पडकें देऊळ त्याला दिसलें. माधव हळूंहळूं ती टेकडी चढून देवळाजवळ गेला. देवळाचें दार उघडेंच होतें. माधव चटकन् देवळांत शिरला. वादळ संपेपर्यंत तेथेंच थांबावें असा त्याचा बेत होता.

"या कोपऱ्यांत बसून जराशी विश्रांति घ्यावी." देवळांतील थंडगार फरशीवर अंग टेकीत माधव स्वतःशींच पुटपुटला, "मी आज इतका दमलों आहे कीं थोडा विसांवा घेतल्याखेरीज एक पाऊलहि पुढें टाकणें मला आतां शक्य नाहीं." देवळामध्यें मारुतीची शेंदूर फासलेली मूर्ति खांद्यावर गदा घेऊन उभी होती. माधवनें मारुतीरायापुढें साष्टांग दंडवत घातला आणि फरशीवर अंग टाकलें. दुसऱ्याच क्षणीं त्याला अगदीं गाढ झोप लागली. बाहेर जोराचें वादळ चाललें होतें. विजा कडकडत होत्या आणि मुसळधार पाऊस पडत होता.

माधव जागा झाला तेव्हां मध्यरात्र उलटली होती. वादळाचा जोर बराच कमी झाला होता. ढग पांगले होते. आणि चंद्राचें फिकट चांदणें देवळाच्या खिडक्यांतून आंत आलें होतें. त्याचे रुपेरी चौकोन जागजागीं पडलेले दिसत होते. त्या चंद्रप्रकाशांत माधवला एक भयंकर गोष्ट दिसली आणि तो अगदीं विस्मयचकित झाला.

देवळाच्या मध्यभागीं एक प्रेत ठेवलेलें होतें. गांवकरी लोकांनीं तें तेथें आणून ठेवलें होतें. तो मेलेला माणूस त्या गांवांत परका होता. त्याचे कोणी आप्तेष्ट अगर नातेवाईक तेथें नव्हते. व त्यामुळें गांवकरी लोकांनीच त्याची अखेरची तयारी केली होती. तें प्रेत त्यांनीं दहनासाठीं आणलें असावें. पण ऐनवेळीं वादळ सुरू झाल्यामुळें दहनाचा बेत सकाळपर्यंत लांबणीवर टाकून निवाऱ्यासाठीं तें प्रेत त्यांनीं देवळांत ठेवलेलें असावें.

तें प्रेत पाहून माधवला भीति वाटली नाही. त्याला फक्त अतिशय दुःख झालें. मृत माणसाचें त्याला कधींच भय वाटत नसे. कारण एक तर कुणालाहि भिण्याजोगें कांहींच पातक त्यानें आजवर कधीं केलें नव्हतें. आणि दुसरें म्हणजे मृत माणसें कधींच कुणाला त्रास देत नाहींत हें त्याला माहीत होतें. मेलेल्या माणसापेक्षां जिवंत व दुष्ट माणसेंच जास्त भयंकर असतात हें तो जाणत होता. त्या प्रेताजवळ दोन परकीं माणसें उभीं होतीं. त्यांच्या चेहऱ्यांवरून त्यांच्या मनांत कांहींतरी दुष्ट हेतु आहे हें माधवनें तात्काळ ओळखलें. त्यांच्या एकंदर आविर्भावावरून त्या बिचाऱ्या प्रेताची विटंबना करण्याचें त्यांच्या मनांत आहे हें माधवच्या चटकन ध्यानांत आलें.

तेवढ्यांत त्या दोघांपैकीं एकजण दुसऱ्यास म्हणाला, " आपण हें प्रेत उचलूं अन् देवळापाठीमागच्या त्या दरींत फेकून देऊं. म्हणजे उद्यां कोल्ह्याकुत्र्यांना नि गिधाडांना चांगली मेजवानी होईल ! "

त्याचे ते दुष्ट व कठोर शब्द ऐकून माधवच्या अंगावर सर्रकन् शहारे उभे राहिले. झटकन् पुढें होऊन किंचित् तीव्र स्वरांत तो त्या परक्या माणसांना म्हणाला, " कां रे बाबांनों, असं भलतं सलतं कां बोलतां ? त्या बिचाऱ्यानें तुमचं असं काय घोडं मारलं आहे ? अरे, मेलेल्या माणसासंबंधीं असं कठोर बोलणं बरं नाहीं. जन्मभर बिचारा झगडला असेल, तडफडला असेल, आतां मेल्यावर तरी त्याच्या आत्म्याला शांति मिळूं द्या "

" शान्ती ! " त्या दोघांपैकीं एकजण ओरडला, " शान्ती मिळते आहे त्याला आतां ! अरे, याची तूं कींव करूं नकोस. मोठा लफंगा माणूस होता हा. आम्हां दोघांकडून यानें कर्जाऊ पैसे घेतले होते अन् ते न फेडतां न सवरतांच बेटा मरून गेला ! आतां आमचे पैसे बुडालेच ना ? तें कांहीं नाहीं. आम्हीं याचा सूड उगवल्याखेरीज राहणार नाहीं. आत्तांच्या आत्तां आम्ही हें प्रेत देवळापाठीमागच्या दरींत फेकून देणार. मग खाऊंदे कोल्हींकुत्रीं फाडफाडून याला— " आणि त्या दुष्टानें खरोखरच प्रेताला हात घातला.

" थांबा ! " चटकन् पुढें होऊन आपल्या कमरेचा कसा सोडीत माधव म्हणाला, " मी देतों तुमचे पैसे .मजजवळ फक्त शंभर रुपयेच आहेत. ते मी तुम्हाला देतों. अन् तेवढ्यांत तुम्हीं याचं कर्ज फेडून द्या. अन या बिचाऱ्याच्या अंगाला हात न लावण्याचं तुम्ही मला

वचन द्या. मजजवळ जास्त पैसे असते तर तेही मी मोठ्या आनंदानें तुम्हाला देऊन टाकले असते. मी चांगला जिवन्त, धट्टाकट्टा माणूस आहे. माझं या पैशांशिवाय कसंहि भागेल. मी कांहीं उपाशी मरायचा नाहीं. परमेश्वर माझ्या पाठीशीं सदैव उमा आहे. " एवढें बोलून कशांतले रुपये माधवनें बाहेर काढले.

त्या पैशांकडे बघून आशाळभूतपणें जिभल्या चाटीत तीं दुष्ट माणसें म्हणालीं, " वा रावसाहेब, अहो तुम्ही जर आमचे पैसे आम्हाला देत असाल तर मग आमचं मुळीं कांहीं म्हणणंच नाहीं. आमचं कर्ज एकदां फिटलं म्हणजे मग आम्ही या प्रेताच्या केसालाहि धक्का लावायचे नाहीं. अहो, त्याचं आमचं तसं कांहीं वैर थोडंच आहे ! "

त्यांचे ते शब्द ऐकून माधवला आनंद झाला. त्यानें आपणाजवळचे शंभर रुपये त्यांना देऊन टाकले. ते पैसे घेऊन माधवच्या भोळेपणाला हंसत हंसत आणि त्याच्याविषयीं तुच्छता दर्शवीत तीं माणसें तेथून चालतीं झालीं.

माधव त्या मृत माणसाजवळ आला. तें प्रेत त्यानें नीट ठेवलें. त्याच्या अंगावरचें पांघरूण नीटनेटकें केलें आणि नंतर डोळ्यांत पाणी आणून त्यानें त्या प्रेताचा निरोप घेतला व तो देवळाबाहेर पडला. नुकत्याच केलेल्या परोपकाराच्या कृत्यामुळें त्याचें मन हलकें झालें होतें. आणि त्याला विलक्षण समाधान वाटत होतें.

## ४ नवा दोस्त

देवळाबाहेर पडल्यावर माधव जंगलांतल्या वाटेनें चालूं लागला. त्या अरण्यांत दाट झाडी होती. झाडांच्या गर्द पालवीमधून चांदण्याचे कवडसे आंत घुसले होते व त्यांनीं जमिनीवर सुंदर नक्षी विणली होती. त्या स्वच्छ चंद्रप्रकाशांत माधवनें एक अद्‌भुत चमत्कार पाहिला. तें पऱ्यांचें अरण्य होतें. अनेक पऱ्या तेथें राहत असत व रात्रीं चांदण्यांत क्रीडा करण्यासाठीं त्या बाहेर पडत. आतांहि कित्येक चिमुकल्या पऱ्या तेथें आनंदानें नृत्य करीत होत्या. माधवला पाहून त्या बिल्कुल दचकल्या नाहींत किंवा घाबरल्याहि नाहींत. माधव हा अतिशय सद्‌गुणी व सज्जन मुलगा आहे हें त्यांनीं तात्काळ ओळखलें. कारण दुर्गुणी व दुष्ट माणसांना मुळीं पऱ्या दिसतच नाहींत. त्या अरण्यांतल्या पऱ्या फार सुंदर पण अगदीं चिमुकल्या होत्या. त्यांच्यापैकीं कित्येकजणीं तर बोटभर लांबीच्याच होत्या. त्यांनीं आपल्या कुरळ्या व रेशमी केसांत सोनेरी कंगवे बसवले होते. कांहीं पऱ्यांनीं टपोऱ्या दंवबिंदूवर गवताचीं चिमुकलीं पातीं आडवीं ठेवलीं होतीं व त्या पात्याच्या दोन्ही टोकांना दोन दोन पऱ्या बसल्या होत्या. एक परी वर गेली कीं दुसरी खालीं येई, दुसरी वर गेली कीं पहिली खालीं येई. असा त्यांचा गंमतीचा खेळ चालला होता. उंच वाढलेल्या गवताच्या पात्यांच्या शेंड्यांवर दंवाचे थेंब मोत्यांसारखे चमकत होते. कांहीं पऱ्या त्या दंवबिंदूवर बसल्या होत्या. दंवाचा तो थेंब घरंगळत खालीं आला म्हणजे त्याहि त्याबरोबर घसरत घसरत खालीं येत

अन् खालच्या मऊ हिरवळीवर त्या धपकन् आदळल्या म्हणजे बाकीच्या पऱ्या टाळ्या पिटून मोठमोठ्यानें हंसत. कित्येक पऱ्या हातांत हात गुंफून नाचत होत्या व गाणीं गात होत्या. तीं गाणीं माधवच्या ओळखीचीं होतीं. तो लहान असतांना त्याची आई जीं अंगाईगीतें गाऊन त्याला झोंपवीत असे त्या गीतांचे सूर अन् या गीतांचे सूर अगदीं सारखेच होते. कांहीं पऱ्या गवतांतच एकमेकींशीं लपाछपी खेळत होत्या. मस्तकावर रुपेरी मुकुट घातलेले मोठमोठे कोळी त्या पऱ्यांकरतां झाडांवर जाळीं विणीत होते. हीं जाळीं म्हणजे त्या पऱ्यांचे राजवाडेच होते. एका राजवाड्यांतून दुसऱ्या राजवाड्यांत जाण्याकरतां कोळ्यांनीं मध्यें मोठमोठे झुलते पूलहि विणले होते. या जाळ्यांवर आणि झुलत्या पुलांवर चिमुकले दंवाचे थेंब पडले होते. आणि चंद्रप्रकाशांत ते हिऱ्यासारखे लखलखत होते. कांहीं पऱ्या या पुलांवरून गंमतीनें धांवत होत्या.

पहांट होईपर्यंत पऱ्यांची ही क्रीडा चालली होती. नंतर सूर्य उगवला. त्याचे पहिले किरण झाडांच्या माथ्यावर चमकूं लागल्या-बरोबर पऱ्यांनीं आपले खेळ आटोपले आणि लहान लहान फुलांमध्यें शिरून त्या झोंपी गेल्या. नंतर पहाटेच्या वाऱ्याची थंडगार झुळूक आली. तिनें त्यांचे ते सुंदर राजवाडे अन् ते झुलते पूल मोडून टाकून आपल्याबरोबर उडवून वाहून नेले.

उन्हें थोडींशीं वर आलीं तेव्हां माधव त्या अरण्यांतून बाहेर पडला. इतक्यांत कोणीतरी गंभीर पण प्रेमळ स्वरांत त्याला म्हटलें, ‘ काय दोस्ता, कुणीकडे निघाला आहेस ? ’

माधवनें चटकन् मागें वळून पाहिलें तेव्हां एक उंचानिंच, धिप्पाड व तरतरीत पुरुष त्याला दिसला. त्याचा चेहरा मायाळू व डोळे हंसरे होते. त्या परक्या पुरुषाकडे न्याहाळून बघत माधव म्हणाला, "मी चाललों आहे असाच जगांत नशीब काढायला. मला आई नाहीं, बाप नाहीं, नातेवाईक नाहींत. कुणी कुणी सुद्धां नाहीं. मी एक गरीब, दरिद्री मुलगा आहे. पण देव माझा पाठीराखा आहे. तो मला कधीं अंतर देणार नाहीं अशी माझी श्रद्धा आहे."

तो परका पुरुष माधवकडे बघून मोठ्या प्रेमळपणानें हंसला व म्हणाला, "मीहि जगांत नशीब काढायलाच निघालों आहे. आपण दोघें मिळूनच जाऊं या. काय हरकत आहे?"

"हो हो. काय हरकत आहे?" माधव उल्हासानें म्हणाला. आणि ते दोघें पुढें चालूं लागले. माधवचा हा नवा दोस्त मोठा सज्जन माणूस होता. लौकरच माधवची व त्याची चांगली गट्टी जमली. माधवनें त्याला आपलें नांव विचारलें. तेव्हां त्यानें चंद्रशेखर असें नांव सांगितलें. चंद्रशेखर मोठा अनुभवी आणि हुषार होता. त्यानें सर्व जगांत प्रवास केलेला असावा आणि सारें ज्ञान मिळविलेलें असावें अशी माधवची खोत्री झाली.

बराच वेळ त्यांचा प्रवास चालू होता. मग सूर्य मध्याह्नीं आला; टळटळित दुपार झाली. अंगांतून घामाच्या धारा वाहूं लागल्या. तेव्हां माधव आणि त्याचा दोस्त एका विशाल वृक्षाच्या थंडगार सांवलींत विश्रांति घेण्यासाठीं बसले. चंद्रशेखरजवळ शिदोरी होती. ती त्यानें काढली आणि मग ते दोघेंजण फराळ करूं लागले. त्यांचें खाणें

चाललें असतां जवळच्या रस्त्यानें एक म्हातारी जात असलेली त्यांनीं पाहिली. ती म्हातारी अगदीं जख्ख झाली होती. तिच्या सबंध चेहऱ्यावर सुरकुत्यांचें जाळें पसरलें होतें. तिच्या पाठीस कुबड आलें होतें. एका हातानें काठी टेकीत टेकीत ती हळू हळू पावलें टाकीत चालली होती. जंगलांत गोळा केलेली लांकडांची मोळी तिनें आपल्या पाठीवर घेतली होती. एका हातानें तिनें आपल्या लुगड्याचा पदर गोळा करून पोटाशीं धरला होता. त्या पदरांत तिनें गुरांना चारण्यासाठीं म्हणून पिंपरीच्या कोवळ्या डहाळ्या घेतल्या होत्या.

पाठीवरच्या ओझ्यानें अधिकच वाकलेली ती म्हातारी चालतां चालतां एकदम पाय घसरून पडली. त्याबरोबर तिनें जोरानें किंकाळी फोडली. कारण तिचा उजवा पाय साफ मोडून गेला होता. गरीब बिचारी ! कशी बशी उठून बसत व हातानें गुडघा चोळीत ती मोठमोठ्यानें रडूं लागली. तिची ती केविलवाणी अवस्था पाहून माधवला तिची दया आली. तो चटकन् उठला आणि धांवतच तिच्याजवळ आला.

“ गरीब बिचारी म्हातारी ! ” तो कळवळून चंद्रशेखरला म्हणाला, “ हिचा पाय चांगलाच दुखावलेला दिसतो. आपण हिला तिच्या घरीं नेऊन पोहोचवूं या. ”

पण चंद्रशेखरनें माधवला कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यानें आपल्या खांद्यावरची पडशी सोडली आणि तिच्यामधून एक लहानशी डबी बाहेर काढली. नंतर तो त्या म्हातारीकडे वळून तिला म्हणाला, “ हें पहा आजीबाई, माझ्याजवळच्या या डबींत एक उत्तम मलम आहे. हें मलम

तुमच्या पायाला मी चोळतों, म्हणजे तो ताबडतोब बरा होईल अन् तुमचं दुःख नाहींसं होऊन तुमच्या अंगांत नवी ताकद येईल. आपण पडलों हें तुमच्या ध्यानींमनीं सुद्धां राहणार नाहीं अन् कुणाच्याही मदतीशिवाय आपल्या आपण तुम्ही घरीं जाल. पण मी तुम्हाला हें मलम देईन त्याबद्दल तुम्हीं सुद्धा मला कांहींतरी द्यायला हवं. तुमच्या जवळ या ज्या पिंपरीच्या डहाळ्या आहेत ना, त्यांतल्या तीन डहाळ्या तुम्हीं मला द्या. अन् मी तुमचा पाय बरा करून टाकतों."

आपल्याजवळच्या डहाळ्या देण्याचें त्या म्हातारीच्या जिवावर आलें. कारण रानांत वणवण हिंडून मोठ्या कष्टानें तिनें त्या गोळा केल्या होत्या. पण डहाळ्या द्यायचें नाकारून काय करते बिचारी! कारण मोडक्या पायानें रस्त्यांत अडून रहाणें देखील मोठें त्रासदायकच होतें. अखेर शेवटी तिनें मुकाट्यानें आपल्या पदरांतून तीन डहाळ्या काढल्या आणि त्या चंद्रशेखरच्या हातीं दिल्या. चंद्रशेखरनेंही लगेच आपल्याजवळचें तें मूल्यवान् मलम काढून म्हातारीच्या मोडलेल्या पायाला चोळलें. तों काय चमत्कार! तिचा पाय ताबडतोब दुरुस्त झाला. आणि पूर्वींपेक्षां कितीतरी झपझप तिला चालतांहि येऊं लागलें. चंद्रशेखरकडे आणि माधवकडे कृतज्ञतेची नजर टाकून आपल्या पाठीवरचें ओझें सांभाळीत ती म्हातारी हळूंहळू तेथून निघून गेली.

माधव आपल्या मित्राकडे वळून म्हणाला, "मला तुमचं मोठं नवल वाटतं. ह्या पिंपरीच्या डहाळ्या घेऊन तुम्हीं काय करणार आहांत? त्यांचा तुम्हांला काय उपयोग होणार आहे?"

त्यावर गालांतल्या गालांत हंसत चंद्रशेखर म्हणाला, “ अरे बाबा, प्रत्येक माणसाला कांहीं ना कांहीं छंद असतात ना, तसाच माझाही हा एक छंद आहे असं समज तूं. तुझ्या दृष्टीला त्या साध्या पिंपरीच्या डहाळ्या दिसताहेत, पण माझ्या दृष्टीनं गुलाबाच्या गुच्छाहूनही त्या अधिक संदर व सुगंधी आहेत ! ” बोलतां बोलतां त्यानें मोठ्या प्रेमानें त्या डहाळ्यांना कुरवाळलें.

त्यावर माधव कांहींच बोलला नाहीं. क्षणभर ते दोघें मुकाट्यानेंच वाट चालत होते. नंतर एकदम समोर क्षितिजाकडे बोट दाखवीत माधव म्हणाला, “ अरे बापरे, आतां लौकरच वादळ होणार असा रंग दिसतोय, पाहिले का कसे काळे काळे ढग दाटून आले आहेत ते ! ”

त्यावर किंचित् हंसून चंद्रशेखर म्हणाला, “ अहा रे वेड्या. ढग नव्हेत कांहीं ते. या तर डोंगराच्या रांगा आहेत. अहाहा ! त्या डोंगरांच्या शिखरांवरची हवा किती ताजी, किती उत्तेजक असते म्हणून सांगूं ! आणि ढग तर तिथें अगदीं आपल्या अंगाला खेटून जातात. अन् पलिकडचा देखावा इतका सुंदर दिसतो कीं, तो बघून कुणा- चेंहि भानच हरपून जावें ! आपला प्रवास एकंदरींनें मोठा छान चालला आहे यांत शंका नाहीं. ”

पण ते डोंगर जरी इतके जवळ दिसत होते तरी त्यांच्याजवळ जाऊन पोहोंचावयाला आपल्या प्रवाश्यांना सबंध एक दिवस लागला. डोंगराजवळ येऊन पोहोंचल्यावर मात्र आपल्या दृष्टींचें सार्थक झाल्या-

सारखें माधवला वाटलें. किती सुंदर होते ते डोंगर ! त्यांच्या उतरणीवर हिरवीगार दाट झाडी वाढली होती. मधून मधून हत्तीसारखे प्रचंड पाषाण पडलेले होते. ते डोंगर चढण्यापूर्वी पायथ्याजवळच्या एका खाणावळींत रात्रभर मुक्काम करून ताजेतवानें व्हावयाचें आणि मग दुसरे दिवशीं सकाळीं डोंगर चढायला प्रारंभ करायचा असा त्या दोघांचा बेत ठरला.

# ५ खाणावळींत काय झालें ?

खाणावळीच्या दाराशीं माधव व चंद्रशेखर आले तेव्हां बाहेरच्या अंगणात लोकांची खूपच दाटी झालेली त्यांना दिसली. त्या दिवशीं खाणावळींत एक काष्ठपुतळीवाला उतरला होता. आणि खाणावळीं-तल्या पाहुण्यांना तो आपल्याजवळच्या लांकडी बाहुल्यांचे खेळ करून दाखवणार होता. ते खेळ बघण्यासाठींच ही सारी गर्दी जमली होती. माधव आणि चंद्रशेखरही प्रेक्षकांत जाऊन खेळ पहा-ण्यासाठीं बसले. पहिल्या रांगेंत एक मोठा विचित्र प्रेक्षक त्यांना दिसला. हा प्रेक्षक म्हणजे एक जाडजूड अन् म्हातारा खाटिक होता. त्याच्या शेजारीं त्याचा कुत्रा होता. हा कुत्राहि आपल्या मालकासार-खाच भला अगडबंब होता. आपले गोल डोळे विस्फारून तो एखाद्या माणसाप्रमाणें टक लावून खेळ बघत होता.

काष्ठपुतळीवाल्यानें प्रथम आपले पडदे वगैरे नीटनेटके लावून घेतले आणि मग खेळ सुरू झाला. पहिल्याप्रथम राजा अन् राणी प्रेक्षकांना दिसलीं. तीं दोघें अतिशय सुंदर व झगमगित सिंहासनावर बसलीं होतीं. त्यांच्या मस्तकावर सोनेरी मुकुट होते आणि त्यांच्या अंगावर मखमलीचीं राजवस्त्रें रुळत होतीं. कांचेचे चमकदार डोळे आणि काळ्याभोर रेशमाच्या मिशा बसवलेले पहारेकरी दाराशीं अन् खिडक्यांशीं अदबीनें पहारा करीत उभे होते. राजाला व राणीला वाऱ्याची थंडगार झुळूक मिळावी एवढ्यासाठीं अधूनमधून ते खिडक्या उघडीत व बंद करीत. एकंदरीनें तो खेळ फारच रंगांत

आला होता. सारें कसें सुरळित चाललें होतें. कुठें अपघात नाहीं, रक्तपात नाहीं, लढाई नाहीं, कांहीं नाहीं ! तोंच, अरेरे !– एक दुर्दैवी घटना घडली. राणीसाहेब सिंहासनावरून उठल्या आणि आपल्या भरजरी शालूचा घोळ सांवरीत त्या डौलांत पावलें टाकीत चालूं लागल्या. सारे प्रेक्षक अगदीं मंत्रमुग्ध होऊन हा देखावा बघत होते. तो म्हातारा खाटीक सुद्धां खेळ बघण्यांत अगदीं तल्लीन झाला होता. त्या नादांत आपल्या कुत्र्याच्या गळपट्टयावरची त्याची पकड जराशी ढिली झाली. त्याबरोबर त्या कुत्र्याच्या मनांत काय आलें कोण जाणे. त्यानें जी ताडकन् उडी मारली ती थेट रंगभूमीवर. सारे प्रेक्षक आश्चर्यचकित होऊन हें काय झालें म्हणून बघताहेत तों त्या अगडबंब कुत्र्यानें राणीची कंबर एवढ्या धसमुसळपणानें आपल्या तोंडांत धरली कीं तिचे बिचारीचे दोन तुकडे झाले ! डोळ्याचें पातें लवतें न लवतें एवढ्यांत हा सारा प्रकार घडून आला ! बिचाऱ्या काष्ठपुतळीवाल्याला तर यावेळीं इतकें दु:ख झालें कीं कांहीं विचारूं नका ! तो अगदीं रडावयाच्या बेतांत आला. ती राणी म्हणजे त्याच्या जवळची सर्वांत सुंदर बाहुली होती. आणि कुत्र्याच्या तोंडांतून तिला ओढून काढीपर्यंत तिचे तीन तुकडे झाले होते. हा अपघात झाल्या-नंतर 'हाय हाय' 'अरेरे' असे दु:खोद्गार काढीत प्रेक्षक भरभर उठून गेले. काष्ठपुतळीवाला कपाळावर हात मारून तेथेंच मटकन् खालीं बसला व ढळढळां रडूं लागला. माधवच्या दोस्ताला त्याची कीव आली. तो त्या काष्ठपुतळीवाल्याजवळ गेला व त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याचें सांत्वन करीत म्हणाला, "घाबरूं नकोस. मी तुझ्या या राणीला दुरुस्त करतों."

नंतर त्यानें आपल्या पडशींतून मलमाची डबी बाहेर काढली. ज्या मलमानें म्हातारीचा मोडलेला पाय दुरुस्त झाला होता तेंच हें मलम होतें. त्यांतलें थोडेसें मलम घेऊन चंद्रशेखरनें तें त्या मोडलेल्या बाहुलीला चोळलें. त्याबरोबर ती बाहुली एकदम बरी झाली; एवढेंच नव्हे तर आपले हातपाय स्वत:च हलवण्याची अद्भुत शक्तीही तिला प्राप्त झाली. काष्ठपुतळीवाल्यानें दोऱ्या न ओढतांही आपल्या सर्व हालचाली ती करूं लागली. खरोखर, ती बाहुली नसून जणं जिवंत माणूसच होती. तिला बोलतां येत नव्हतें येवढेंच काय तें. आपली राणी-बाहुली स्वत:च चालूं लागली, नाचूं लागली हें बघून त्या काष्ठपुतळीवाल्याला जो आनंद झाला त्याचें काय वर्णन करावें? त्याच्या दुसऱ्या कोणत्याहि बाहुलीमध्यें हें चातुर्य नव्हतें.

त्या दिवशीं रात्रीं खाणावळींतली सारीं माणसें गाढ झोपीं गेलीं असतां हळूं हळूं कांहीं गोंगाट सुरू झाला. कांहीं वेळानें तो गोंगाट इतका वाढला कीं प्रत्येकजण झोंपेंतून जागा होऊन आश्चर्यानें विचारपूस करूं लागला. तो काष्ठपुतळीवाला लगबगीनें जागा होऊन घाईघाईनें आपल्या बाहुल्या ठेवलेल्या होत्या त्या जागेकडे गेला, कारण हा सारा गोंगाट तेथूनच येत होता. तेथें गेल्यावर एक विचित्र देखावा त्याच्या नजरेस पडला. राजा असलेली बाहुली आणि आणि इतरही सर्व बाहुल्या एकत्र जमून आरडाओरडा करीत होत्या. त्या मोठमोठ्यानें उसासे टाकीत होत्या. आपले कांचेचे डोळे गरगर फिरवीत होत्या. आणि एकंदरीनें आपल्याला फार वेदना होत [illegible] असेंच जणं त्या सुचवीत होत्या. हें सारें नाटक करण्याच्या [illegible]

मागें त्यांचा एकच हेतु होता. मलम लावल्यामुळें राणीला जसे आपले हातपाय हलवतां येत होते तसेच ते आपल्यालाहि हलवतां यावेत अशी त्यांची इच्छा होती. इकडे राणी-बाहुली जमिनीवर गुडघे टेकून बसली होती. आणि आपला सोन्याचा मुकुट दोन्ही हातांत उंच धरून मोठ्या आर्जवी चेहऱ्यानें ती टकमक बघत होती. जगूं ती विनवणी करीत होती, "वाटल्यास माझा हा सोनेरी मुकुट घ्या. पण राजाला अन् इतर सर्व शिपायांना, नोकराचाकरांना हातपाय हलवतां यावेत म्हणून त्यांच्या अंगाला पण तें जादूचं मलम चोळा!"

हा सारा देखावा पाहून त्या काष्ठपुतळीवाल्याला अगदीं गहिंवर आला. तो लगेच चंद्रशेखरकडे आला आणि अतिशय केविलवाण्या स्वरांत त्याला विनवून म्हणाला, "तुमचं तें मलम काढा अन् माझ्या या इतर बाहुल्यांच्या अंगालाहि पण तें चोळा. तुम्हीं एवढं केलंत तर उद्यांच्या खेळाला जें उत्पन्न होईल हें सारंच्या सारं मी तुम्हांला देऊन टाकीन!"

त्यावर मान हलवून चंद्रशेखर म्हणाला. "मला तुमचे पैसे नकोत."

"मग काय देऊं?" काष्ठपुतळीवाला गयावया करून म्हणाला, "काय मागाल तें देतों पण माझ्या बाहुल्यांना तेवढं तें मलम लावा!"

"तुझ्या कमरेला ती लांबलचक धारदार तलवार लटकते आहे ना, तेवढी दे. दुसरं कांहीं नको मला." चंद्रशेखर म्हणाला.

त्याबरोबर त्या काष्ठपुतळीवाल्यानें झटकन् आपल्या कमरेची तलवार उपसून ती चंद्रशेखरच्या हातीं दिली. मग चंद्रशेखरनेंही त्याच्या सर्व बाहुल्यांच्या अंगाला आपल्या जवळचें तें अद्‌भुत मलम चोळलें.

मल्म चोळल्याबरोबर राणी बाहुलीप्रमाणेंच त्या सर्व बाहुल्यांना आपले हातपाय हलवण्याची शक्ति प्राप्त झाली. लगेच हातांत हात अडकवून त्या सर्व बाहुल्या इतक्या सुंदर रीतीनें नाचूं लागल्या कीं त्यांचा तो नाच पाहून खाणावळींत त्या रात्रीं मुक्कामाला उतरलेल्या सर्व तरुण मुलींना नृत्य करण्याची स्फूर्ति आली. त्याहि लगेच हातांत हात गुंफून नाचूं लागल्या. त्या नाचूं लागल्यावर स्वैंपाकी, वाढपी, नोकर-चाकर, खाणावळींतले पाहुणे—सर्वचजण उठून नाचत सुटले. स्वैंपाक-घरांतला चिमटा अन् सांडशी सुद्धां आपल्या दोन पायांवर नाचायला लागलीं. पण नाच सुरूं केल्याबरोबर तोल जाऊन तीं दोघेंही जमिनी-वर कोलमडलीं. त्यांची फजिती पाहून सर्व माणसें खदखदां हंसत सुटलीं.

खरोखर ती रात्र सर्वांनींच मोठ्या आनंदांत घालविली.

# ६ मधुपुरीनगरींत

दुसरे दिवशीं पहाटेच उठून माधव अन् चंद्रशेखर यांनीं आपला प्रवास पुढें चालू केला. पायथ्याशीं असलेलीं मोठमोठीं प्रचंड अरण्यें ओलांडून त्यांना ते उंच उंच डोंगर आतां चढून जायचें होतें. जरा वेळानें ते त्या डोंगरावर इतके उंच चढून गेले कीं, भोंवतालच्या मैलच्या मैल लांब पसरलेला प्रदेश आतां त्यांना दिसूं लागला. या प्रदेशांत सर्वत्र दाट हिरवीगार झाडी वाढलेली होती. या झाडींतून डोकावणाऱ्या कौलारू घरांचीं लाल माथीं पाचूत बसवलेल्या माणकां-प्रमाणें शोभत होतीं. वर बघावें तर स्वच्छ निळ्या आकाशाच्या प्रचंड घुमटांतून मध्याह्नीं तळपणाऱ्या सूर्याचें उबदार सोनेरी ऊन खालीं ओतत होतें. आणि स्वैर वाहणाऱ्या झुळकांबरोबर शिकारी लोकांनीं वाजविलेल्या शिंगांचे आवाज तरंगत येत होते. सृष्टीचें असें रम्य आणि सुंदर स्वरूप माधवनें आजवर कधींहि पाहिलें नव्हतें. ते शिंगांचे आवाज तर इतके विलक्षण आकर्षक होते कीं ते ऐकून माधवचें देहभान हरपलें आणि त्याच्या डोळ्यांत पाणीच उभें राहिलें. त्याचा मित्र, चंद्रशेखर हा या वेळेपावेतों माधवच्या शेजारीच उभा होता. त्यानें आपले दोन्ही हात एकांत एक गुंतवून ते छातीवर आडवे ठेवले होते. तो कसल्यातरी खोल विचारांत गढून गेल्यासारखा दिसत होता. पण तरी सुद्धां आभाळांतली, डोंगरावरची अगर खालच्या जमिनीवरची कुठलीहि लहान सहान गोष्ट देखील त्याच्या तीक्ष्ण नजरेंतून सुटत नव्हती.

असे दोघेंजण डोंगर माथ्यावर उभे होते तोंच आकाशांतून तरंगत जाणाऱ्या एका दिव्य स्वर्गीय गीताचे स्रोत त्यांच्या कानांवर आले. माधवनें वर पाहिलें तों त्याला एक विलक्षण चमत्कार दिसला. आकाशांतून एक प्रचंड पांढराशुभ्र हंसपक्षी चालला होता आणि त्याच्याच कंठांतून त्या स्वर्गीय संगीताचे स्वर पाझरत होते. आजवर कोणत्याहि पक्ष्यानें इतकें सुंदर गीत गाइलेलें माधवनें कधीं ऐकलें नव्हतें. पण आतां माधवच्या कानांवर जें गाणें येत होतें तें त्या हंसाचें मृत्युगीत होतें. मृत्युसमयीं हंस जें गीत गातो तें अत्यंत मधुर असतें. हळूहळू त्या गीताचे स्वर मंद आणि अस्पष्ट होऊं लागले. त्या हंसाची डौलदार शुभ्र मान लटकी पडली आणि अखेर शेवटीं तो हंस खालीं कोसळून मृत होऊन माधवच्या पायांशीं येऊन शांत झाला.

त्या मेलेल्या हंसाकडे पाहून माधवला वाईट वाटलें पण त्याचा मित्र चंद्रशेखर मात्र म्हणाला, " माधव, या हंसाचे पंख पाहिलेस कसे रुंद अन् पांढरेशुभ्र आहेत? हे असे सुंदर पंख वायां जाऊं देतां कामा नयेत. मी हें मजजवळ ठेवून देतों. कधींतरी उपयोगीं पड-तील. " असें म्हणून त्यानें आपल्या कमरेची लांबलचक धारदार तलवार उपसली आणि एका तडाक्यांत त्या हंसाचे पंख त्यानें कापून घेतले. " बघितलंस ? " माधवकडे वळून किंचित् हंसून तो म्हणाला, " या तरवारीचा कांहीं उपयोग करतां येतोय् मला ! "

यानंतर माधव आणि चंद्रशेखर यांनीं त्या डोंगरमाथ्यावर मैलच्या-मैल प्रवास केल्यानंतर अखेर शेवटीं पलीकडच्या बाजूला खालीं हिरव्या.

गार झाडीमध्यें त्यांना एक विस्तीर्ण नगरी दिसली. त्या नगरीं-तल्या शेंकडों सुंदर देवालयांचे कळस आणि पांढऱ्याशुभ्र प्रासादांचे मनोरे सूर्याच्या उन्हांत तळपत होते. नगरीच्या मध्यभागीं एक अत्यंत सुंदर व डौलदार प्रासाद उभा होता. तो पांढऱ्या व गुलाबी संगमरवरानें बांधलेला असून त्याचीं छपरें लालजर्द सोन्यानें मढव-लेलीं होतीं. तीं उन्हांत इतकीं झळझळ करीत कीं, त्यांच्याकडे नजर टाकली म्हणजे डोळे अगदीं दिपून जात. ह्या प्रासादांत त्या नगरीचा राजा रहात असे.

डोंगर उतरून गेल्यावर आपल्या प्रवाश्यांनीं एकदम त्या नगरींत प्रवेश केला नाहीं. प्रथम ते गांवाबाहेर असलेल्या एका छोट्याशा खाणावळींत उतरले. तेथें त्यांनीं स्वच्छ आंघोळ केली व मग जेवण केलें. खाणावळीचा मालक मोठा बडबड्या माणूस होता. माधव आणि चंद्रशेखर यांना जेवण वाढतां वाढतां त्यानें त्या नगरीची सर्व माहिती त्यांना सांगून टाकली. तो म्हणाला, "आमच्या नगरींचें नांव मधुपुरी आणि आमच्या महाराजांचें नांव मधुसूदन महाराज. आमचे राजेसाहेब इतके प्रेमळ, इतके दयाळू अंतःकरणाचे आहेत कीं, काय सांगावं ! आज त्यांचं वय निदान सत्तर वर्षांचं तरी असेल. पण आपल्या उभ्या आयुष्यांत त्यांनीं कुणालासुद्धां कधीं दुखवलं नाहीं बघा, पण त्यांची मुलगी—"

" काय ? काय तुमच्या मधुसूदनमहाराजांना मुलगी आहे ? " माधवनें एकदम उत्सुकतेनें प्रश्न केला.

" होय. " एक उसासा टाकून खाणावळवाला म्हणाला,

" आमच्या महाराजांना एकुलती एक मुलगी आहे. तिचं नांव मधु-राणी- तिची आई तिच्या लहानपणींच वारल्यामुळं महाराजांनीं राजकन्येला अतिशय प्रेमानं अन् लाडानं वाढवलेलं आहे. पण काय सांगू तुम्हांला पाहुणे ? आमचे महाराज जेवढे दयाळू तेवढीच ही राजकन्या मधुराणी दुष्ट अन् क्रूर आहे! तिच्या सौंदर्याबद्दल विचाराल तर तिच्यासारखी रूपसुंदर देखणी मुलगी या सर्व पृथ्वीवरसुद्धां शोधूनहि तुम्हाला सांपडणार नाहीं. पण राजकन्येच्या सौंदर्यसंपन्न देहांतलं काळीज मात्र अगदीं फत्तराचं आहे. अहो—" आपला स्वर किंचित् खालावून तो म्हणाला. " राजकन्या मधुराणी ही एक चेटकी आहे खरोखरी, अन् आपल्या कपटी जादूच्या बळावर आजवर कितीतरी तरुण अन् देखण्या राजपुत्रांचे तिनें बळी घेतले आहेत ! "—

" राजपुत्रांचे बळी घेतले आहेत तिनं ? " माधवनें आश्चर्यचकित होऊन विचारलें, " ते कसे काय बुवा ? "

" ऐका तर. सांगतोंच तुम्हाला सारं कांहीं." खाणावळवाला उत्तेजित स्वरांत म्हणाला, " राजकन्या अत्यंत सुंदर असल्यामुळें तिचं प्रेम जिंकण्याच्या हेतूनं देशोदेशींचे राजपुत्र या नगरींत येतात. राजपुत्रच कशाला, वाटेल त्या तरुणानं आपलं प्रेम जिंकण्याच्या प्रयत्न करायला राजकन्येनें परवानगी देऊन ठेवलेली आहे. पण तिचं प्रेम जिंकणं आजवर कुणालाही शक्य झालेलं नाहीं, अन् यापुढें सुद्धां ती गोष्ट मला अशक्यच दिसते आहे. कारण राजकन्येनं एक अगदीं कठिण असा पण लावलेला आहे. आणि तो पण जिंकील त्यालाच ती माळ घालणार आहे—"

" काय आहे राजकन्येचा पण?" माधवनें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" आपलं प्रेम जिंकण्याच्या हेतूनं येणाऱ्या कोणत्याहि तरुणाला राजकन्या एकच प्रश्न विचारते." खाणावळवाला सांगू लागला " हा तिचा प्रश्न असा कीं यावेळीं माझ्या मनांत कसले विचार घोळत आहेत? अन् तिचे विचार त्या तरुणाला जर तीन वेळां ओळखतां आले तरच ती त्याच्याशी लग्न करील इतकंच नव्हे तर आपल्या मधुसूदनमहाराजांना मुलगा नसल्यामुळें त्याच्या मृत्यूनंतर मधुपुरीचं राज्यही त्या तरुणालाच मिळेल. परंतु राजकन्येच्या मनांत काय विचार घोळत आहेत हें ओळखणंच तर अत्यंत कठीण काम आहे. आलेला तरुण ते विचार ओळखण्यांत चुकला म्हणजे राजकन्या तात्काळ त्याचा वध करते. आजवर एकाहि तरुणाला राजकन्येच्या मनांतले विचार ओळखतां आले नाहींत, अन त्यामुळं त्या सगळ्यांना आपल्या प्राणाला मुकावं लागलं. कित्येकांचा शिरच्छेद झाला तर कित्येकांचीं डोकीं उडवलीं गेलीं! या सर्व हकीगतीवरून राजकन्या मधुराणीचं अन्तःकरण किती क्रूर अन् निर्दय आहे याची कल्पना आलीं असेलच तुम्हाला. आपल्या लेकींचा हा दुष्ट अन् हट्टी स्वभाव पाहून मधुसूदन महाराजांच्या अंतःकरणाला विलक्षण यातना होतात. पण काय करतील बिचारे! 'तुझ्या लग्नाच्या बाबतींत मी कांहींही बोलणार नाहीं' असं राजकन्येला त्यांनीं एकदां वचन दिलं होतं. आतां म्हणून त्यांना या प्रकरणांत कांहींही ढवळाढवळ करतां येत नाहीं. यामुळं झालंय् काय, जो कोणी राजपुत्र अगर दुसरा एकादा तरुण पुरुष राजकन्येचं प्रेम जिंकायच्या हेतूनें मधपूरींत येतो आणि अयशस्वी ठरतो त्याचा शिरच्छेद तरी होतो

अगर तो फांसावर तरी चढतो. बरें, या तरुणांना आधीं दोन गोष्टी सांगून त्यांचं मन वळवावं म्हटलं तर तें सुद्धां शक्य नाहीं, इतकी राजकन्येच्या सौंदर्याची त्यांच्यावर मोहनी पडलेली असते. राजकन्येच्या या दुष्टपणामुळं देशावर जी आपत्ति ओढवली आहे त्यामुळें महाराजांना अत्यंत दु:ख होतं. राजकन्येच्या स्वभावांत पालट घडावा येवढ्यासाठीं महाराज आणि त्यांचे सर्व सैनिक हे वर्षांतून एक दिवस कडकडीत उपास करतात अन् राजवाड्यांतल्या महादेवाच्या देवळापुढच्या विस्तृत पटांगणांत बसून देवाची प्रार्थना करतात. पण इतकं असूनसुद्धां राजकन्येच्या दुष्टपणांत काडीमात्र बदल झालेला नाहीं!"

## ७ राजकन्या मधुराणी

" काय भयंकर स्त्री आहे ही तुमची राजकन्या मधुराणी! " खाणावळवाल्याची हकिगत सांगून संपतांच माधव एकदम संतापानें व त्वेषानें उद्गारला, " प्रथम तरुणांच्या मनावर आपल्या सौंदर्याची मोहनी घालायची अन् मग त्यांचा निर्दयपणें प्राण घ्यायचा! छे! छे! राजकन्या मधुराणी कितीहि सुंदर असो, तिच्या प्रेमांत पडण्याइतका मूर्खपणा निदान माझ्या हातून तरी कधींच घडणार नाहीं. असल्या स्त्रीवर कुणाचं प्रेम बसणं शक्य तरी आहे काय? " माधव असें बोलतो आहे तोंच रस्त्यावर कुणाचा तरी प्रचंड जयजयकार चाललेला त्याच्या कानांवर आला म्हणून ते सर्वजण घाईघाईनें खिडकीशीं जाऊन पाहूं लागले. खिडकींतून बघतांना माधवला खालीं रस्त्यावर जें दृश्य दिसलें तें पाहून तो विस्मयानें थक्क होऊन गेला.

रस्त्यावरून राजकन्या मधुराणीच आपल्या दासीसह घोड्यांवरून दौडत चालली होती. तिच्या सौंदर्याची जादू अशी अवर्णनीय होती कीं, तिचें दर्शन झाल्याबरोबर तिच्या दुष्टपणाचा लोकांना अजिबात विसर पडे आणि तिच्या नांवाचा प्रचंड जयजयकार करतांना ते आनंदानें अगदीं देहभान विसरून जात. आतांहि लोक मधुराणीला बघतांच आनंदानें बेहोष होऊन ओरडत होते, "राजकन्या मधुराणीचा जयजयकार असो." आणि राजकन्या किंचित् हंसून खालीं मान वांकवून त्या जयजयकाराचा स्वीकार केल्याचें दर्शवीत होती.

त्या वेळचा मधुराणीचा थाट आणि रुबाब कांहीं और होता.

तिच्याबरोबर तिच्याच वयाच्या बारा तरुण अन् सुंदर दासी काळ्या-भोर घोड्यांवर स्वार होऊन तिच्यापुढें व आजूबाजूनें अदबीनें चालल्या होत्या. त्या सर्वजणी पांढरींशुभ्र रेशमी पातळें नेसल्या होत्या व आपल्या अंगांत त्यांनीं पांढऱ्या रेशमी चोळ्या घातल्या होत्या. त्यांच्या गळयांत मोत्यांचे सुंदर अलंकार होते व त्यांपैकीं प्रत्येकीनें आपल्या हातांत एकेक सुवर्णकमळ धरलेलें होतें. हें सुवर्ण-कमळ मधुराणीच्या सत्तेचें व वैभवाचें चिन्ह होतें.

खुद्द राजकन्येचा झोंक तर अगदीं अवर्णनीय होता. ती स्वत: एका दुधासारख्या शुभ्र घोड्यावर स्वार झाली होती. हा घोडा चांदीच्या घुंगुरमाळांनीं सजवलेला असून त्यावर किनखापाचें जीन घातलेलें होतें. राजकन्येचें नेसतें पातळ भरजरी पिवळ्या रेशमाचें होतें आणि तिच्या पिवळ्या चोळीवर कलाबतूनें सुंदर फुलें भरलेलीं होतीं. तिच्या अंगावर सोन्या मोत्यांचे अलंकार असून तिच्या कमरपट्ट्यावर हिरे आणि माणकें जडवलेलीं होतीं. राजकन्येनें आपल्या हातांत धरलेला चाबूक तळपत्या सूर्यकिरणासारखा चमचम करीत होता. आपल्या मस्तकावरच्या काळ्याभोर कुरळ्या केसांवर राजकन्येनें एक सोन्याचा मुकुट दाबून बसविलेला होता. या मुकुटावर जडविलेले हिरे आकाशांतल्या तारकांप्रमाणें लखलखत होते. तिनें आपल्या खांद्यांवर टाकलेला पातळ रेशमी बहुमोल शेला तर जणूं फुलपांखराच्या पंखांचाच बनविलेला असावा असा नाजूक वाटत होता. पण राजकन्येचें हें सारें वैभव तिच्या सौंदर्यापुढें अगदीं फिकें पडत होतें. तिचें हास्य कोवळ्या उन्हासारखें प्रसन्न आणि आल्हाददायक होतें. काळ्याभोर ढगांवर वीज

चमकून जावी तसें तिच्या डोळ्यांतलें तेज दिसत होतें. आणि तिच्या भव्य व उंच कपाळावरचा कुंकुमतिलक तिच्या भाग्याची आणि वैभवाची साक्ष पटवीत होता.

माधवनें राजकन्या मधुराणीच्या सुंदर चेहऱ्याकडे क्षणभर पाहिलें मात्र, आणि त्याच्या शरीरांतलें सारें रक्त त्याच्या मस्तकांत, कानाशिलांत उसळून आलें. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. मंत्रानें बांधून टाकल्यासारखा तो जागच्या जागींच खिळून उभा राहिला. एखाद्या वेड्या माणसाप्रमाणें तो राजकन्येला टक लावून पाहूं लागला. तो सुंदर चेहरा त्याच्या ओळखीचा होता. कुठें बरें पाहिला होता तो चेहरा माधवनें? माधवचे वडील वारले त्या रात्रीं माधवनें हीच सुंदर तरुणी आपल्या स्वप्नांत पाहिली होती.

मधुराणीचें सौंदर्य पाहून माधवचें देहभान हरपलें. पृथ्वीच्या पाठीवर असें लावण्य कुठें पहावयास मिळेल असें त्याला वाटलें नव्हतें. मधुराणीला पाहिल्याबरोबर माधव जिवाभावानें तिच्यावर प्रेम करूं लागला. तो स्वत:शींच म्हणाला, "मधुराणीच्या दुष्टपणाबद्दल अन् ती एक चेटकी असल्याबद्दल आपण जें कांहीं ऐकलं तें सारं खोटं असलं पाहिजे. राजकन्येचं प्रेम जिंकण्याचा प्रयत्न करण्याची वाटेल त्या दरिद्री माणसालाही परवानगी आहे ना? ठीक आहे. मी आतां राजवाड्यांत जाईन अन् मधुराणीचा पण जिंकून तिला आपलीशी करून घेईन. कारण यापुढें मधुराणीशिवाय एक दिवसही जगणें मला सर्वस्वीं अशक्य आहे."

माधवनें आपला हा विचार बोलून दाखवला त्यावेळीं भोंवतालच्या

माणसांना मोठाच धक्का बसला. हा असला वेडेपणा न करण्या-बद्दल सर्वजण माधवची परोपरीनें विनवणी करूं लागले. तो खाणा-वळवाला तर अगदीं गयावया करून माधवला म्हणाला, “ कशाला या फंदांत पडून स्वतःचे प्राण गमावतोस बाबा ! इतर तरुणांची कशी दशा झाली तें ऐकलंस ना ? ” चंद्रशेखरनेंहि माधवचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. त्यानें राजवाड्यांत जाऊं नये म्हणून चंद्रशेखरनें त्याची पुष्कळ समजूत घालून पाहिली, पण माधव आपला हट्ट सोडीना. तो एकच धरून बसला, “ मी राजकन्येचें प्रेम जिंकण्याचा प्रयत्न करणारच करणार ! ”

माधवचा तो हट्ट पाहून सर्वांचाच निरुपाय झाला. नंतर माधव राजवाड्यांत जाण्यासाठीं तयारी करूं लागला. त्यानें आपले कपडे स्वच्छ धुवून उन्हांत सुकविले. नंतर हात, पाय, तोंड धुवून पुसून ते कपडे त्यानें अंगांत चढविले. मानेपर्यंत वाढलेले आपले मऊ काळेभोर केस त्यानें काळजीपूर्वक विंचरले, आणि मग त्यानें सरळ राजवाड्याची वाट धरली.

2638

## ८ मृत्यूचा बाग

राजवाड्याच्या भव्य दरवाजांतून माधवनें आंत प्रवेश केला. त्या-वेळीं मधुसूदनमहाराजांनीं स्वत: पुढें येऊन त्याचें स्वागत केलें. महाराज अत्यंत वृद्ध होते. त्यांची पांढरीशुभ्र दाढी त्यांच्या छातीवर रुळत होती. त्यांनीं अंगांत मखमालीचा अंगरखा घातला होता. रेशमी सुरवार नेसून पायांत त्यांनीं कलाबतूचें नक्षीकाम केलेले मखमाली चढाव घातले होते. त्यांच्या एका हातांत सोन्याचा पृथ्वीगोल व दुसऱ्या हातांत सोन्याचा राजदंड होता. हा पृथ्वीगोल व राजदंड म्हणजे मधुसूदनमहाराजांच्या राजसत्तेचीं चिन्हें होतीं.

माधवला पाहून महाराजांना आनंद झाला. परंतु आपल्या मुलीचें प्रेम जिंकण्याचा प्रयत्न करण्यासाठीं तो आला आहे हें जेव्हां महाराजांना कळलें तेव्हां त्यांना अत्यंत दु:ख झालें. त्यांना एकदम रडें कोसळलें; त्यांच्या हातांतला राजदंड निसटून खालीं पडला आणि पृथ्वी-गोल तर कुठच्या कुठेंच घरंगळत गेला. आपल्या अंगरख्याच्या टोकानें डोळ्यातले अश्रु पुशीत घोगऱ्या स्वरानें महाराज म्हणाले, " माधव, तूं चांगला धष्टपुष्ट, धट्टाकट्टा तरुण आहेस. तूं कां या फंदांत पडून आपलं आयुष्य व्यर्थ संपवतोस? इतरांची जी गत झाली तीच तुझीही होईल. इकडे ये, इकडे ये अन् मी काय दाखवतों तें पहा जरा."

येवढें बोलून मधुसूदनमहाराजांनीं माधवला हातीं धरून राजकन्येच्या महालाशेजारच्या बागेंत नेलें. तेथें जें दृश्य माधवला दिसलें तें पाहून कुणाच्याही अंगावर भीतीनें कांटाच उभा राहिला असता. त्या बागें-

तल्या कित्येक झाडांवर हाडांचे सांपळे लटकत होते. राजकन्येचें प्रेम जिंकण्यासाठीं आलेल्या पण त्या बाबतींत अयशस्वी झालेल्या दुर्दैवी तरुणांना फांसावर लटकवण्यांत आलें होतें. त्यांचेच सांपळे होते ते ! झाडांच्या पालवींतून ज्यावेळीं वाऱ्याची झुळूक सळसळत जाई त्यावेळीं ते पांढरे सांपळे एकमेकांवर आदळून खळखळ आवाज करीत. त्या भयंकर दृश्यानें भेदरून गेल्यामुळें बागेंतलीं सारीं पांखरें केव्हांच तेथून नाहींशीं झालीं होतीं. त्या स्मशानांत चुकूनसुद्धां एकहि पक्षी कधीं यावयास धजत नसे. बागेंतल्या वेलींना आधार द्यावयासाठीं काटक्या-ऐवजीं मोठमोठीं हाडेंच कुंड्यांतून पुरून ठेवलेलीं होतीं. साऱ्या बागेंत ठिकठिकाणीं माणसांच्या कवट्या दांत विचकीत पडलेल्या दिसत होत्या. प्रत्यक्ष मृत्यूचीच बाग होती ती !

त्या कवट्या व ते सांपळे माधवला दाखवून मधुसूदनमहाराज त्याला म्हणाले, "तुझी अवस्था पुढें काय होईल याची कल्पना आतां तुला आलीच असेल. माधव, मी तुझ्यापुढें पदर पसरून तुला विनवणी करतों. तूं आपल्या मनांत आणलेला खुळा विचार ताबडतोब सोडून दे. तुझ्यासारखा उमदा तरुण फुकट मरून गेला तर मला अतिशय दुःख होईल. तुला स्वतःच्या प्राणांची चिंता वाटत नसेल तर निदान माझ्याकडें बघून तरी तूं आपला हेका सोड."

मधुसूदनमहाराजांचें आपणांवरील प्रेम पाहून माधवला गहिंवरून आलें. त्यानें झटकन् खालीं वांकून महाराजांच्या पायाला स्पर्श केला आणि तो नम्रपणें म्हणाला, " महाराज, आपण मजवर येवढं प्रेम करतां याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. परंतु मला आपला निश्चय

मोडावयाचा नाहीं. काय वाटेल तें करून राजकन्येचा पण जिंकावयाचाच असा मी निर्धार केला आहे. तिच्याखेरीज एक दिवसहि जिवंत राहणें मला आतां शक्य नाहीं."

त्या दोघांचें असें बोलणें चाललें आहे; तोंच आपलें फिरणें संपवून राजकन्या परत राजवाड्यांत आल्याची वर्दी नोकरानें आणली. तेव्हां मधुसूदनमहाराज आणि माधव हे दोघेजण तिला भेटावयास म्हणून तिच्या महालांत गेले. मधुराणीनें अत्यंत आपुलकीनें माधवचें स्वागत केलें. तिचें वागणें इतकें प्रेमळ आणि बोलणें इतकें मधुर होतें कीं, माधवला तिच्याविषयीं अधिकच प्रेम वाटूं लागलें. मधुराणी ही एक दुष्ट चेटकी असून ती तरुणांना ठार करीत असेल या गोष्टीवर त्याचा मुळींच विश्वास बसेना.

मधुराणीनें माधवला आणि महाराजांना मोठ्या सन्मानपूर्वक आपल्या महालांत नेलें. तेथें रंगीबेरंगी पोषाख केलेल्या छोट्या छोट्या हुजऱ्यांनीं चांदीच्या ताटल्यांतून सर्वांना मिठाई खावयास दिली. माधवला ती मिठाई फार आवडली. पण मधुसूदनमहाराजांचें मन इतकें उदास झालें होतें कीं, ती गोड मिठाईदेखील त्यांना खावीशी वाटेना.

मिठाईचा कार्यक्रम संपल्यानंतर माधव घरीं जावयास निघाला. त्यानें दुसरे दिवशीं दरबारांत हजर रहावें आणि तेथें मधुसूदनमहाराज, इतर सर्व मंत्री आणि सरदार दरकदार यांच्या पुढ्यांत राजकन्या मधुराणीनें माधवला आपल्या मनांतला विचार ओळखण्यास सांगावें असें ठरलें. पहिल्या दिवशीं जर माधवला मधुराणीच्या मनांतला विचार

ओळखतां आला तर दुसरे दिवशीं त्यानें पुन्हां दरबारांत यावयाचें होतें. पण आजवर पहिल्या दिवशींच्या परीक्षेंतच मुळीं कुणीं टिकलें नव्हतें.

आपण हातीं घेतलेल्या अवघड कार्याबद्दल माधवला मुळींच भीति वाटत नव्हती. उलट त्याला अधिकाधिक उत्साह वाटूं लागला होता. महाराणीचें सौंदर्य, तिचे प्रेमळ बोल त्याला पुन्हां पुन्हां आठवत होते आणि तिला जिंकण्यांत आपण यशस्वी होऊं याबद्दल त्याला बिलकूल शंका वाटत नव्हती. राजवाड्यांतून आपल्या खाणावळींत परत येतांना त्यांचें हृदय आनंदानें नाचत होतें.

## ९ मध्यरात्रींचा प्रवास

माधव परत खाणावळींत आला त्यावेळीं चंद्रशेखर त्याची वाटच बघत होता. माधवनें चंद्रशेखरला मधुराणीच्या अनेक गोष्टी ऐकविल्या. ती किती सुंदर आहे, किती सुस्वभावी आहे, तिचें बोलणें किती गोड आहे हें सारें चंद्रशेखरला सांगून नंतर माधव म्हणाला, " चंद्रशेखर, मला असं होऊन गेलंय् कीं कधीं एकदां मी उद्यां राजवाड्यांत जातों अन् कधीं मधुराणीच्या मनांतला विचार ओळखून काढतों——"

पण माधवच्या आनंदाचा आणि उत्साहाचा चंद्रशेखरवर कांहींच परिणाम झाला नाहीं. खिन्नपणें मान हलवून तो म्हणाला, " माधव, माझं तुझ्यावर किती प्रेम आहे म्हणून सांगूं ! आपण दोघांनीं पुढचं सारं आयुष्य खूप आनंदांत काढावं असं मला. वाटत होतं. पण आतां मी तुला मुकणार ! अरेरे ! माझा गरीब बिचारा माधव ! पण जाऊंदे, आपण दोघें आज ही शेवटचीच सायंकाळ एकत्र घालवणार, तेव्हां निदान आज तरी मी तुझ्या आनंदाचा विरस करीत नाहीं. आज आपण खूप हंसूं खेळूं. मग उद्यां मला भरपूर रडावयाचेंच आहे."

राजकन्येचें प्रेम जिंकण्यासाठीं एक नवा उमेदवार आल्याची वार्ता हा वेळ पावेतों साऱ्या नगरींत पसरली होतीच. आणि त्यामुळें चहूंकडे एक प्रकारें शोकाचें वातावरण दिसत होतें. कारण आजवर आलेल्या इतर तरुणांची जी गत झाली तीच या नव्या तरुणाचीहि होणार आहे याबद्दल कुणालाही संशय वाटत नव्हता

त्या दिवशीं रात्रीं जेवल्यानंतर माधव आणि चंद्रशेखर दोघेंजण सुखदुःखाच्या गोष्टी बोलत बसले. परंतु दोन तीन घटका गेल्या नाहींत तोंच माधवच्या पापण्या जड झाल्या आणि लौकरच तो गाढ झोपीं गेला. माधव झोपलेला पाहून चंद्रशेखर हळूंच आपल्या बिछान्यावरून उठला आणि त्यानें खिडकीबाहेर एकवार डोकावून पाहिलें. गांवातले सर्व लोक आपापल्या घरांतून झोपीं गेले होते, आणि सर्वत्र पूर्ण शांतता पसरली होती. तें पाहून चंद्रशेखरला समाधान वाटलें. त्यानें आपल्याजवळचे ते मेलेल्या हंसाचे पंख काढले आणि आपल्या खांद्यांवर ते घट्ट बांधून टाकले. नंतर म्हातारीनें दिलेल्या पिंपरीच्या डहाळ्या हातीं घेऊन तो हळूंच खिडकीबाहेर आला. येवढें झाल्यावर खांद्यावरच्या पंखांच्या योगानें भराऱ्या मारीत तो जों निघाला तों थेट राजवाड्यामध्यें आला. राजवाड्यांत आल्यानंतर राजकन्येच्या महालाच्या एका खिडकीखालीं तो लपून राहिला.

राजवाड्याच्या मनोऱ्यावरच्या घड्याळांत रात्रीच्या बाराचे ठोके पडल्याबरोबर राजकन्येच्या महालाची खिडकी एकदम उघडली आणि राजकन्या तीमधून बाहेर पडली. तिनें आपल्या अंगावर एक पांढरी शाल गुंडाळून घेतली होती आणि तिच्या पाठीवर दोन भलेपोठे काळे पंख दिसत होते. ते पंख उभारून राजकन्येनें एकदम उड्डाण केलें. लौकरच नगर ओलांडून दूर अंतरावर असलेल्या एका पर्वताच्या दिशेनें ती हवेंतून भरारत चालली. चंद्रशेखर हें सारें बघतच होता. त्यानें एकदम स्वतःला अदृश्य केलें आणि तो राजकन्येपाठोपाठच आकाशांतून जाऊं लागला. त्यानें आपल्याजळच्या पिंपरीच्या काटक्या

हवेंतून तीन वेळ फिरवल्या आणि तो पुटपुटला, "वाहा रे वाऱ्यांनो, पूर्वेच्या, पश्चिमेच्या, दक्षिणेच्या, उत्तरेच्या वाहा रे वाऱ्यांनों !" चंद्रशेखरच्या तोंडून हे शब्द बाहेर पडतांच चारीं दिशांनीं वारे वाहूं लागले. त्या वाऱ्यांच्या योगानें राजकन्येच्या अंगावरची शाल चहुंकडे गोल पसरली आणि कपडे सांवरतां सांवरतां तिची अगदीं तारांबळ उडाली.

"काय वारं सुटलं आहे मेलं? अन् थंडी तरी किती वाजते आहे !" तोंडावर वरचेवर येणारे केस सांवरीत राजकन्या म्हणाली.

जरा वेळानें ती एका पर्वतावर येऊन पोहोंचली. पर्वताच्या एका बाजूवर तिनें आपल्या बोटांनीं 'टक् टक्' केलें. त्याबरोबर पर्वताच्या पोटांतून मेघगर्जनेसारखा आवाज झाला आणि त्याला एक मोठें भगदाड पडलें. राजकन्येनें चटकन् त्या भगदडातून आंत प्रवेश केला. तिच्यापाठोपाठ चंद्रशेखरही आंत गेला.

[illegible]
[illegible]
क्र. ... 2038 .. दिनांक ....
[illegible]

## १० कुबड्याच्या राजवाड्यात

ते दोघेजण प्रथम एका लांब व अरुंद बोळांतून पुढें गेले. त्या बोळाच्या दोन्ही बाजूच्या भिंती नुसत्या झगमग झगमग करीत होत्या. कारण विस्तवासारख्या लालभडक रंगाचे हजारों कोळी त्या भिंतींवरून एकसारखे धांवत होते. बोळ ओलांडल्यानंतर मधुराणी व चंद्रशेखर यांनीं एका मोठ्या दिवाणखान्यांत प्रवेश केला. हा दिवाणखाना चांदीसोन्यानें बांधून काढला होता. या दिवाणखान्याच्या भिंतीवर तबकांएवढीं वाटोळीं व लाल, निळ्या, पिंवळ्या रंगाचीं अनेक फुलें झळकत होतीं. त्या फुलांचे हिरवेजर्द देठ भिंतीवरून खालीं लोंबकळत होते. पण हीं फुलें तोडावयाच्या हेतूनें जर कुणी त्यांना हात लावायला गेलें असतें तर त्याची भीतीनें बोबडीच वळली असती. कारण त्या फुलांचे देठ हे खरोखरी हिरवेगार लांबलचक विषारी सर्प होते आणि वरचीं फुलें म्हणजे त्या सापांच्या तोंडांतून बाहेर पडणाऱ्या निळ्या लाल ज्वाळा होत्या. दिवाणखान्याच्या छतावरून शेंकडों काजवे इकडे तिकडे धांवत होते. आणि छताला चिकटून बसलेल्या वटवाघळांचे निळसर रंगाचे पंख एकसारखे फडफडत होते, दिवाणखान्याच्या मध्यभागीं एक खूप मोठें आसन ठेवलेलें होतें. या आसनाखालीं चार घोड्यांचे सांपळे बसवलेले होते आणि या घोड्यांच्या तोंडांत कोळ्यांच्या ततूंनीं विणलेले लगाम दिले होते. आसन दुधासारख्या पांढऱ्याशुभ्र कांचेचें होतें. या आसनावर जी गादी ठेवली होती तींत कापसाऐवजीं उंदरांचीं लहान लहान पिलें

भरलेलीं होतीं. तीं पिलें एकसारखीं चुळबुळत होतीं व एकमेकांच्या शेपट्यांना चावत होतीं. आसनावर जें छत होतें तें कोळ्यांच्या जाळ्याचें बनविलेलें असून त्याचा रंग गडद जांभळा होता. आणि या छतावर हिरव्या रंगाच्या सुंदर माशा बसविल्या होत्या. त्या पाचूसारख्या चमकत होत्या.

या आसनावर एक अत्यंत वृद्ध व कुरूप असा कुबडा बसला होता. त्यानें आपल्या मस्तकावर मूल्यवान् मुकुट धारण केला होता. आणि त्याच्या डाव्या हातांत सोन्याचा राजदंड होता. मधुराणीनें त्या कुबड्याच्या पायांवर डोकें ठेवून त्याला वंदन केलें. त्यावर त्यानें तिचा हात धरून मोठ्या प्रेमानें तिला आपल्याशेजारीं बसवून घेतलें.

नंतर राजकन्येच्या स्वागतासाठीं तऱ्हतऱ्हेच्या वाद्यांचा एकच गजर सुरू झाला. मोठमोठे काळे नाकतोडे सारंगीच्या तारांवर नाचूं लागले. एका कोपऱ्यांत बसलेलें घुबड 'घू घू घू घू' असा घूत्कार करूं लागलें. चमकणाऱ्या शेपटांचे काजवे हातांत हात घालून आसनाभोंवतीं फेर धरून नाचूं लागले. घुबडांचें गायन सुरू झाल्याबरोबर भपकेदार रंगीबेरंगी पोषाख केलेले सरदारदरकदार मोठ्या रुबाबानें दरबारांत येऊन बसले. सिंहासनाच्या पाठीमागें लपून बसलेल्या चंद्रशेखरनें जेव्हां या मंडुळींकडे पाहिलें तेव्हां त्याला हंसूंच कोसळलें. कारण हे सारे सरदारदरकदार म्हणजे केरसुण्यांच्या माथ्यावर भोपळे बसून तयार केलेलीं बाहुलीं होतीं. जादुगारानें आपल्या जादूनें त्यांना सजीव केलें होतें. आणि त्यांना रंगीत कपडे दिले होते. एवढेंच

काय ते ! आपल्या दरबाराला शोभा यावी येवढ्यासाठींच त्याचा हा सारा खटाटोप होता.

काजव्यांचा नाच आणि घुबडांचें गाणें हा करमणुकीचा कार्य-क्रम कांहीं वेळ चालल्यानंतर जादूगारानें त्या सर्वांना तेथून निघून जाण्याची आज्ञा दिली. नंतर मधुराणीकडे वळून तो म्हणाला, " काय मुली, काय बातमी आहे ? "

" महाराज, " मधुराणी नम्रपणें त्या कुबड्याला म्हणाली, " माझं प्रेम जिंकण्यासाठीं एक नवा तरुण उमेदवार मधुपुरींत हल्लीं आला आहे. उद्यां सकाळीं माझ्या मनांतला विचार ओळखण्यासाठीं दर-बारांत येणार आहे तो. त्यावेळीं कोणत्या वस्तूसंबंधीं विचार करावा बरं मी ? "

क्षणभर विचार करून कुबडा म्हणाला, " हें बघ, मी सांगतों तुला. असं कर; कुठल्यातरी अगदीं सामान्य वस्तूचा तूं विचार कर. ती वस्तु जितकी सामान्य असेल तितकी ती ओळखणं कठीण पडेल या नव्या उमेदवाराला. हें बघ— " तिच्या पायांतल्या सोन्याच्या तोड्यांकडे बघत कुबडा म्हणाला, " तूं उद्यां पायांतल्या सोन्याच्या तोड्यांसंबंधीं विचार करीत रहा. मग तूं कसला विचार करते आहेस हें त्या तरुण माणसाला मुळींच ओळखतां यायचं नाहीं. नंतर तुम्हांला उद्यां त्याचा शिरच्छेद करतां येईल. पण मधुराणी, त्याचं मस्तक कापलं म्हणजे त्याचे डोळे काढून ते तूं मला आणून दे बरं का. त्याचे डोळे आणले नाहींस तर तुझे डोळे काढून घेईन मी. हा आपला करार तूं नीट लक्षांत ठेव. ठेवशील ना ? "

थरथर कांपत कुबड्याला लवून नमस्कार करून मधुराणी नम्रपणें म्हणाली, " होय महाराज, हा करार नीट ध्यानांत ठेवीन मी. " नंतर कुबड्यानें तोंडांतल्या तोंडांत कांहीं जादूचे मंत्र म्हटले. त्या बरोबर तो पर्वत पुन्हां दुभंग झाला आणि राजकन्या मधुराणी बाहेर पडली. पण ती बाहेर येते न येते तोंच चंद्रशेखरही झपाट्यानें तिच्या पाठोपाठ बाहेर आला. राजकन्या आकाशांतून उडूं लागली. पण चंद्रशेखरनें आपल्याजवळच्या पिंपरीच्या डहाळ्यांच्या जादूनें एवढें प्रचंड वादळ निर्माण केलें कीं राजकन्येची अगदीं तारांबळ उडाली. त्या थंड व चावऱ्या वाऱ्यांपासून स्वतःचा बचाव करतां करतां तिची दुर्दशा झाली. राजवाड्यामधल्या आपल्या महालाच्या खिडकीपाशीं ती येऊन पोहोंचली तेव्हां कुठें तिला हायसें: वाटलें. चंद्रशेखरही रात्रींच्या या उड्डाणानें थकून गेला होता. खाणावळींतल्या आपल्या खोलींत येऊन त्यानें आपले पंख काढून ठेवले आणि नंतर बिछान्यावर अंग टाकून तो तात्काळ गाढ झोपीं गेला.

## ११ परीक्षा

दुसरे दिवशीं पहाटेच माधव आणि चंद्रशेखर दोघेही जागे झाले. चंद्रशेखरनें माधवला आपल्या रात्रींच्या उड्डाणासंबंधीं कांहींच सांगितलें नाहीं. परंतु माधव जेव्हां राजवाड्यांत जावयास निघाला तेव्हां चंद्रशेखर त्याला म्हणाला, " हें बघ माधव, राजकन्या ज्यावेळीं आपल्या मनांतला विचार तुला ओळखायला सांगेल त्यावेळीं तूं तिला असं सांग कीं ती आपल्या पायांतल्या सोन्याच्या तोड्यांसंबंधीं विचार करीत आहे. "

" ठीक आहे. असंच उत्तर देईन मी तिला. " माधव म्हणाला, " अन् खरोखर, मला तर वाटत, परमेश्वर माझ्या बाजूनं आहे. तेव्हां त्यानंच तुमच्या मनांत या उत्तराची प्रेरणा केली असावी. बरें तर, मी आतां आपला निरोप घेतों. आजचं माझं उत्तर चुकलं तर मग आपली उभयतांची पुन्हां गांठही पडणार नाहीं ! "

चंद्रशेखर झटकन् पुढें होऊन माधवला कडकडून भेटला आणि गहिंवरून म्हणाला, ' मित्रा, हातीं घेतलेल्या कार्यात विजयी होऊनच परत ये. "

माधव राजवाड्यांत आला त्यावेळीं राजवाड्यांतला दरबाराचा दिवाणखाना उत्तम रीतीनें शृंगारलेला होता. दरबारांतली मानकरी मंडळी आपल्या आसनांवर अदबीनें बसली होतीं. माधवनें दरबारांत पाऊल टाकलें तेव्हां स्वतः मधुसूदनमहाराजांनीं सिंहासनावरून उठून माधवचें स्वागत केलें व त्याला सिंहासनाजवळच दुसऱ्या

एका आसनावर मोठ्या सन्मानपूर्वक बसवलें. मधुसूदनमहाराजांचा चेहरा अत्यंत उदास दिसत होता व खिशांतला पांढरा रेशमी रुमाल काढून ते पुन्हां पुन्हां डोळयांतलीं आंसवें पुशीत होते.

सर्व लोक आपापल्या जागेवर नीट बसल्यावर राजकन्या मधुराणी दरबारांत आली. कालच्यापेक्षांही आज ती अधिक सुंदर व अधिक प्रेमळ वाटत होती. माधवकडे पाहून एका गोड हास्यानें तिनें त्याचें स्वागत केलें, तेव्हां माधवला फार समाधान वाटलें.

नंतर परीक्षेला प्रारंभ झाला. माधवच्या चेहऱ्याकडे रोखून बघत राजकन्या संथपणें म्हणाली, " माधव, माझ्या मनांत यावेळीं कसला विचार आहे ? "

राजकन्येच्या पायांकडे नजर लावून माधव ताडकन् म्हणाला, " राजकन्ये, यावेळीं तूं आपल्या पायांतल्या सोन्याच्या तोड्यांसंबंधीं विचार करीत आहेस ! "

माधवचें तें उत्तर ऐकून मधुराणी चपापली. तिचा चेहरा पांढराफटक पडला आणि तिचे हातपाय कांपूं लागले. तिच्या तोंडून एक शब्दही बाहेर फुटेना. कारण माधवनें तिच्या प्रश्नाचें बिनचूक उत्तर दिलें होतें.

राजकन्या मुकाट बसलेली पाहून मधुसूदनमहाराजांचा आनंद गगनांत मावेना. त्यांनीं आनंदानें टाळ्या पिटल्या. दरबारांतल्या इतर मंडळीनींहि माधवला मिळालेल्या विजयासंबंधीं आपला आनंद व्यक्त केला.

माधव मोठ्या समाधानानें घरीं परत आला. चंद्रशेखर त्याची वाटच बघत होता. माधवला बघतांच चंद्रशेखरनें त्याला घट्ट मिठी

मारली व त्याचें पुन्हां पुन्हां कौतुक केलें. माधवनें मात्र आपल्या विजयाबद्दल ' ही देवाची कृपा ! ' असे उद्गार काढले. आतां दुसऱ्या दिवशीं त्याला राजकन्येच्या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें होतें.

आजची रात्रही कालच्या रात्रींप्रमाणेंच पार पडली. माधवला झोंप लागल्याबरोबर चंद्रशेखर खाणावळींतून बाहेर पडला आणि राजकन्येच्या पाठोपाठ त्या विचित्र पर्वतापर्यंत आला. कालच्याप्रमाणेंच आजही त्यानें वादळ उठवलें. इतकेंच नव्हे तर त्या वादळांत पावसाचीहि भर घातली. वाऱ्याच्या सोसाट्यानें आणि पावसाच्या टपोऱ्या थेंबांच्या वर्षावानें बिचाऱ्या मधुगणीची अगदीं गाळण उडून गेली. पर्वताचा आसरा मिळाल्यावर तिला हायसें वाटलें. पर्वताला भगदाड पडतांच चंद्रशेखरहि राजकन्येच्या पाठोपाठच आंत गेला. तेथें जें जें कांहीं घडलें तें सर्व त्यानें पाहिलें. तो मात्र कुणाच्याहि नजरेस पडला नाहीं. राजकन्या व जादूगार यांच्या आजच्या भेटींत असें ठरलें कीं, उद्यां ज्यावेळीं माधव दरबारांत येईल त्यावेळीं राजकन्येनें आपल्या हातांतील जडावाच्या बांगड्यांचा विचार करावा.

अर्थात् दुसरे दिवशीं राजकन्येच्या मनांतला विचार ओळखणें माधवला मुळींच अवघड गेलें नाहीं. चंद्रशेखरनें त्याला आधीं सूचना दिलेली होतीच. माधवनें आजही बरोबर उत्तर दिलेलें पाहून साऱ्या दरबारांत हर्षाची एकच आरोळी उठली. राजकन्या मात्र अत्यंत खिन्न झाली. तिनें एकदम कोचावर अंग टाकून दिलें आणि ती कुणाशीं एक अक्षरही बोलायला तयार होईना.

आतां माधवच्या परीक्षेचा एकच दिवस उरला होता. तिसरे दिवशींहि त्यानें राजकन्येच्या मनांतला विचार बरोबर ओळखला तर मग तो पण जिंकणार होता. रूपसुंदर मधुराणी त्याला माळ घालणार होती आणि मधुसुदनमहाराजांच्या नंतर मधुपुरीचें राज्यही त्यालाच मिळणार होतें. पण तिसऱ्या दिवशीं जर कां त्याचें उत्तर चुकलें तर मग त्याचा शिरच्छेद होणार होता आणि त्याचे सुंदर काळेभोर टपोरे डोळे भेट म्हणून त्या कुबड्या जादूगाराला मिळणार होते !

त्या दिवशीं माधवनें रोजच्यापेक्षांही जरा आधींच जेवण उरकून घेतलें. बिछान्यावर अंग टाकतांक्षणींच त्याला अगदीं गाढ झोप लागली. माधव झोपल्याबरोबर चंद्रशेखरनें हंसाचे पंख आपल्या पाठीवर बांधले, कमरेला तलवार लटकावली आणि हातांत पिंपरीच्या डहाळ्या घेऊन तो तडक राजकन्येच्या महालाकडे आला.

## १२ शिरच्छेद, पण कुणाचा ?

मध्यरात्रींचा सुमार. सर्वत्र काळाकुट्ट अंधार दाटला होता. वारे आधींच घोंगावूं लागले होते. चंद्रशेखरनें आपल्या हातांतल्या पिंपरीच्या डहाळ्या हवेंतून जोरानें फिरवल्या. त्याबरोबर प्रचंड वादळ सुरू झालें. मुसळधार पाऊस पडूं लागला. वारा जोरानें वाहूं लागला. राजवाड्याभोंवतालच्या बगीच्यांतलीं झाडें वेतासारखीं कराकर लवूं लागलीं. मधूनच आभाळांत लखकन् वीज चमकून जाई आणि मग ढगांचा प्रचंड गडगडाट होई. वादळाचा जोर क्षणोक्षणीं वाढूं लागला. राजकन्येनें आपल्या महालाची खिडकी उघडून हळूंच बाहेर डोकावून पाहिलें. वादळाचें थैमान पाहून ती घाबरून गेली. पण करते काय ? रोजच्याप्रमाणें आजही कुबड्या जादूगाराच्या भेटीला जाणें तिला आवश्यकच होतें. अखेर आपली पांढरी शाल अंगाभोंवतीं घट्ट लपेटून ती खिडकीबाहेर पडली आणि आभाळांतून भरारत चालली. तिला वादळाची एरव्हीं फारशी भीति वाटत नसे; उलट गंमतच वाटे. पण आजचें वादळ कांहीं विलक्षणच होतें. राजकन्येनें आपल्या अंगाभोंवतीं लपटून घेतलेली शाल वाऱ्याच्या झोतानें तिच्याभोंवतीं छत्रीसारखी गोल पसरली. पावसाच्या धारा तिच्या चेहऱ्याला सुईसारख्या बोचूं लागल्या. टपोऱ्या गारांचे तिच्या अंगावर सारखे तडाके बसूं लागले. आपल्या पंखांतली उडण्याची शक्ति नाहींशी होऊन आपण जमिनीवर कोसळतों कीं काय याची क्षणोक्षणीं तिला धास्ती वाटूं लागली. अखेरशेवटीं मोठ्या प्रयासानें एकदांची ती त्या पर्वताजवळ येऊन पोहोंचली

" काय ग बाई तरी ! कसलं प्रचंड वादळ उठलंय् बाहेर ! " पर्वताच्या पोटांत प्रवेश केल्यावर राजकन्या त्या कुबड्या जादूगाराला म्हणाली, " मी तर माझ्या सबंध आयुष्यांत असलं वादळ कधीं पाहिलं नव्हतं ! " बोलतांना तिचे ओठ कांपत होते आणि सर्वांग थंडीनें हुडहुडत होतें.

" तसं म्हटलं तर वादळ होणं कांहीं वाईट नव्हे ! " कुबडा जादूगार गंभीरपणें म्हणाला, " पण चांगल्या गोष्टीचा सुद्धां कधीं कधीं अतिरेक होतो ! "

आणि मग थंडीनें आणि भीतीनें कांपत कांपत राजकन्येनें गेल्या दोन्ही दिवसांच्या दरबारची हकीगत त्या कुबड्याला सांगितली. अखेर शेवटीं खिन्न स्वरांत ती म्हणाली, " गेले दोन दिवस या तरुण माणसानें माझ्या मनांतले विचार जसे बरोबर ओळखले तसाच उद्यांही माझ्या मनांतला विचार तो बरोबर ओळखील. तसं झालं म्हणजे मला मुकाट्यानं त्याच्या गळ्यांत माळ घालावी लागेल. मग मला जगण्याची आशाच नको. कारण एकदां माझं लग्न झालं म्हणजे आपल्याकडून एवढ्या प्रयासान जी जादू मी शिकून घेतली आहे तिचा मला उपयोग करतां यायचा नाहीं. " बोलतां बोलतां राजकन्या पदरानें तोंड झांकून ओक्साबोक्शीं रडूं लागली.

" घाबरूं नकोस मधुराणी ! काय वाटेल तें झालं तरी उद्यां कांहीं तुझ्या मनांतला विचार त्या तरुण माणसाला ओळखतां यायचा नाहीं ! " राजकन्येची समजूत घालीत तो कुबडा जादूगार म्हणाला, " मी तुला विचार करण्यासाठीं एवढी अवघड गोष्ट सुचवीन, कीं

माधवलाच काय, कुणालासुद्धां ती ओळखतां येऊं नये. बरं आतां रडणं पुरे. आपण घटकाभर जरीं मौज करूं या."

कुबड्या जादूगाराच्या तोंडून हे शब्द बाहेर पडतांच चहुंकडे नाचगाण्याचा एकच गोंधळ सुरूं झाला. घुबड गाऊं लागलें. पांखरें चिंवचिंवाट करूं लागलीं. आपल्या चमकत्या दिवट्या घेऊन कोळी व काजवे नाचत सुटले आणि काळे नाकतोडे आपल्या पायांनीं सारंगीच्या तारा वाजवूं लागले !

सुमारें अर्धी घटका असें नाचगाणें चालल्यावर राजकन्या मधुराणी राजवाड्यांत जावयास निघाली. तेव्हां तो कुबडा जादूगार म्हणाला,"आज मी तुला राजवाड्यापर्यंत पोहोंचवायला येतों, चल!"

बाहेरच्या वादळाचा जोर अजूनही कमी झालेला नव्हताच. त्या वादळांतून जादूगार व राजकन्या राजवाड्याकडे आभाळांतून भरारत चाललीं. चंद्रशेखरही त्यांच्या पाठोपाठ होताच. राजवाड्यांतील आपल्या महालाच्या खिडकीजवळ राजकन्या जेव्हां येऊन पोहोंचली तेव्हां तिचा निरोप घेतां घेतां तिच्या कानाशीं तोंड आणून जादूगार हलकेंच म्हणाला, " उद्यां तूं माझ्या डोक्यासंबंधीं विचार कर. बरं कां ! "

त्या कुबड्या जादूगारानें हे शब्द अगदीं हळू उच्चारले होते पण त्याच्या पाठीमागेंच असलेल्या चंद्रशेखरला ते शब्द ऐकूं गेल्यावांचून राहिले नाहींत. त्याला अतिशय आनंद झाला.

राजकन्या खिडकींतून आपल्या महालांत शिरली आणि कुबडा जादूगार पर्वताकडे जाण्यासाठीं म्हणून माघारीं वळला. त्याबरोबर

चंद्रशेखर झटकन् पुढें झाला. आपल्या कमरेची तरवार त्यानें सर्रकन् उपसली आणि डाव्या हातानें त्या कुबड्याची लांबलचक काळीभोर दाढी पकडून उजव्या हातानें चंद्रशेखरनें त्याचा शिरच्छेद केला !

हा सर्वच प्रकार इतक्या जलदीनें घडून आला, कीं त्या कुबड्या जादूगाराला कांहींहि करतां आलें नाहीं. चंद्रशेखरनें जादूगाराचें धड समुद्रांत फेकून दिलें आणि मस्तक मात्र त्यानें आपल्या जवळच्या रेशमी हातरुमालांत बांधून घेतलें. मस्तक रुमालांत बांधण्यापूर्वी प्रथम त्यानें तें पाण्यांत बुडवून घेतलें होतें; त्यामुळें त्यांतून रक्त वहावयाचें थांबलें होतें. नंतर रुमालाचें गांठोडें पाठीवर टाकून चंद्रशेखर खाणावळींत परत आला व गांठोडें खुंटीला लटकावून गाढ झोंपी गेला.

दुसरे दिवशीं माधव जेव्हां दरबारांत जावयास निघाला तेव्हां चंद्रशेखरनें तें रुमालाचें गाठोडें माधवच्या हातीं दिलें.

गांठोड्याकडे न्याहाळून बघत आश्चर्यानें माधव म्हणाला, " काय आहे या गांठोड्यांत ? "

त्यावर गालांतल्या गालांत हंसून चंद्रशेखर म्हणाला, " तें गांठोडें आधीं उघडूं नकोस. ज्यावेळीं राजकन्या तुला आपल्या मनांतला विचार ओळखायला सांगेल त्यावेळीं तूं मुकाट्यानें हें गांठोडें तिच्या-पुढें उघडून ठेव म्हणजे झालें. जा आतां ! "

आज दरबारांत माणसांची नुसती खेंचाखेंच झाली होती. मोठे-मोठे सरदार दरकदार आणि इतर मानकरी लोक आपापल्या आसनां-वर व्यवस्थितपणें बसले होते. सिंहासनावरील किनखापी गादीवर मखमालीच्या लोडाला टेकून मधुसूदनमहाराज बसले होते. त्यांच्या

अंगावरचा जरतारी रेशमी पोषाक झगमगत होता. त्यांच्या हातांतला पृथ्वीगोल आणि राजदंड लखलख करीत होता आणि त्यांच्या मस्तकावरील मुकुटांतल्या रत्नांचें तेज सर्वत्र फांकलें होतें. दरबारांतल्या प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्सुकता दिसत होती. राजकन्या मधुराणी मात्र त्याला अपवाद होती. ती जरीचा काळा शालू नेसली होती आणि तिचा चेहरा अतिशय उदासवाणा दिसत होता.

माधव दरबारांत आला. मधुसूदनमहाराजांना लवून मुजरा करून नंतर तो राजकन्येच्या पुढ्यांत येऊन बसला. त्याच्या चेहऱ्याकडे टक लावून बघत गंभीर स्वरांत मधुराणी म्हणाली, " यावेळीं माझ्या मनांत कसले विचार चालू आहेत, सांगा बरं ! "

माधव किंचित् हंसला. चंद्रशेखरनें दिलेली सूचना त्याला आठवली. त्याबरोबर कांहीं न बोलतां त्यानें आपल्याजवळचें तें गाठोडें सोडून राजकन्येच्या पुढ्यांत ठेवलें. गाठोड्यांत कुबड्याचें मस्तक दिसतांच भयानें व आश्चर्यानें थक्क होऊन माधव दोन पावलें मागेंच सरकला. आजूबाजूचे लोक आश्चर्यानें पुटपुटले, " बापरे ! हें काय ? "

रुमालांतलें कुबड्या जादूगाराचें कापलेलें मस्तक पाहिल्यावर राजकन्येला एवढा धक्का बसला कीं एक घडीभर तिच्या तोंडून शब्दही बाहेर फुटेना. त्या मस्तकाकडे ती वेड्यासारखी टक लावून बघत बसली.

अखेर शेवटीं आपल्या आसनावरून ती उठली आणि आपल्या गोजिरवाण्या गोऱ्यापान हातांनीं माधवचे पाय धरून ती हलकेंच पुटपुटली, " आजहि माझ्या मनांतला विचार बरोबर ओळखून मी

लावलेला पण आपण जिंकला आहे. मी आतां आपली दासी झालें आहे. मला पदरांत घ्यावं !" पण हे शब्द बोलतांनाहि तिनें माधवच्या चेहऱ्याकडे अगर आजूबाजूला कुठेंही पाहिलें नाहीं. तिची दृष्टि एकसारखी त्या कुबड्या जादूगाराच्या मस्तकावरच खिळून राहिली होती.

राजकन्या मधुराणीनें माधवचे पाय धरल्याबरोबर साऱ्या दरबारांत हर्षाची एकच आरोळी उठली, "माधवनें पण जिंकला. विजयी उमेदवाराचा जयजयकार असो !" मधुसूदनमहाराजांनीं तर धांवत पुढें येऊन माधवला आपल्या छातीशीं घट्ट कवटाळून धरलें.

## ११ शुभमंगल

माधवनें राजकन्येचा पण जिंकल्याची वार्ता तात्काळ राजवाड्यांतून बाहेर पडली आणि हां हां म्हणतां साऱ्या मधुपुरींत पसरली. चहुंकडे आनंदोत्सव सुरू झाला. देवळांतल्या घंटांचा घणघणाट होऊं लागला. रस्तोरस्तीं गुढ्या व तोरणें उभारलीं गेलीं. चौकाचौकांतून चौघडे व सनया वाजूं लागल्या. राजकन्येच्या विवाहाची तयारी चालू झाली. आचारी आपापले झारे व पळ्या घेऊन राजवाड्याकडे धांवत सुटले. लाडवांचे डोंगरच्या डोंगर तयार झाले. भाज्यांच्या राशी पडल्या. खिरींच्या नद्या वाहूं लागल्या. पक्वान्नांच्या गोड वासानें वातावरण दरवळून गेलें. सायंकाळीं गोरज मुहूर्तावर राजकन्या मधुराणी व माधव यांचें लग्न लागलें. रात्रीं सर्व मधुपुरी दिव्यांच्या लखलखाटानें उजळून गेली. शिपाई तोफा व बंदुका उडवूं लागले. ल्हान मुलें फटाके आणि फुलबाज्या पेटवून नाचूं लागलीं. राजवाड्यांत पंक्तीवर पंक्ती उठल्या. सारे लोक म्हणूं लागले, "असा सोहळा नि असा थाट आम्हीं साऱ्या जन्मांत कधीं पाहिला नव्हता !"

या साऱ्या आनंदोत्सवांत एकच माणूस खिन्न आणि उदासवाणें दिसत होतें. तें माणूस म्हणजे स्वत: राजकन्या मधुराणी. माधवनें कितीही खटपट केली तरी मधुराणीची कळी कांहीं केल्या खुलेना. ती आपली दुर्मुखलेलीच ! तें पाहून माधवला अर्थातच फार दु:ख झालें. चंद्रशेखरला एका बाजूला बोलावून तो त्याला हळूंच म्हणाला, "एवढा मोटा लग्नाचा सोहळा झाला पण मधुराणीच्या ओठांवर कांहीं हंसू

फुलल नाहीं. ती आपली सारखी गंभीर अन् उदास होऊन बसली आहे ! तिची ही खिन्नता कशी घालवावी न् तिला कसं हंसवावं हें कांहीं केल्या कळत नाहीं मला ! तुम्हीं तरी युक्ति सांगा ना."

चंद्रशेखरनें हंसून मान डोलावली आणि आपल्या खिशांतून एक छोटीशीं कुपी बाहेर काढून त्यानें ती माधवच्या हातांत दिली. नंतर हंसाच्या पंखांतलीं तीन पिसेंहि त्यानें माधवला दिलीं. तो म्हणाला, या कुपींत जादूचं पाणी भरलेलं आहे. या पिसांपैकीं एकेक पीस तूं "या पाण्यांत बुडवून नंतर तें राजकन्येच्या कपाळावर शिंपड. असं तूं तीनदां केलंस म्हणजे राजकन्येवर त्या कुबड्या जादूगारानं घातलेल्या जादूचा प्रभाव नाहींसा होईल आणि राजकन्या तुझ्याशीं हंसूं खेळं लागेल."

रात्रीं ज्यावेळीं माधव राजकन्येच्या महालांत गेला त्यावेळी ती आपल्या पलंगावर बसून राहिली होती. माधवनें एक पीस हातीं घेतलें आणि कुपीतल्या जादूच्या पाण्यांत बुडवून तें त्यानें मधुराणीच्या कपाळावर शिंपडलें. त्याबरोबर मधुराणीनें एक मोठी किंकाळी फोडली आणि ती अदृश्य होऊन तिच्या जागीं विस्तवासारख्या लालभडक डोळ्यांची एक काळी हंसी दिसूं लागली. माधवनें दुसरें पीस घेतलें आणि तें जादूच्या पाण्यांत बुडवून त्यानें त्या काळ्या हंसीच्या कपाळावर शिंपडलें. त्याबरोबर ती हंसी एकदम दुधासारखी पांढरीशुभ्र झाली. फक्त तिच्या गळ्याभोंवती एक काळी रेषा मात्र उरली. माधवनें तिसरें पीस पाण्यांत बुडवून शिंपडलें त्याबरोबर ती हंसी अदृश्य होऊन पुन्हां तेथें मधुराणी प्रकट झाली. परंतु ही मधुराणी पूर्वीच्या

राजकन्येहून शतपटीनें अधिक सुंदर होती. तिचे गाल आरक्त दिसत होते. ओठ हंसत होते आणि डोळ्यांतून कृतज्ञतेचीं व आनंदाचीं आंसवें ओघळत होतीं.

मधुराणींत झालेला हा पालट पाहून माधवला अत्यंत विस्मय वाटला. तो तिला म्हणाला, " हा काय प्रकार आहे मधुराणी? मला सारं कांहीं नीट समजावून सांग."

" ऐकावं सारं कांहीं." माधवच्या पायाशीं बसून मधुराणी सांगूं लागली, " फार पूर्वींची हकिगत आहे ही. त्यावेळीं मी दहाअकरा वर्षांची असेन. एके दिवशीं दिवेलागणीच्या वेळीं मी एकटीच राजवाडयाबाहेरच्या जंगलांत हिंडत होतें. भुताखेतांची वेळ होती ती. त्यावेळीं पर्वतांत रहाणाऱ्या त्या कुबडया जादूगाराच्या मी नजरेस पडलें. मला बघतांच त्यानं माझ्यावर जादू टाकली. अन् तेव्हांपासून मला तो देईल ते हुकुम पाळणं भाग पडूं लागलं. या जादूचा प्रभाव येवढा मोठा होता, कीं जादूगाराला मरण आल्यावरही त्या जादूंतून माझी सुटका होत नव्हती. पण आज तुम्ही या भयंकर जादूंतून मला मुक्त केलंत! मी आतां अगदीं स्वतंत्र झालें. तुमचे उपकार मी कसे फेडूं?"

" तूं माझी राणी ना?" मधुराणीला जवळ घेऊन तिला कुरवाळीत माधव म्हणाला, " मग आतां ही उपकारांची भाषा कां बोलतेस?"

कुबड्या जादूगाराच्या जादूंतून राजकन्या मुक्त झाल्याचें कळल्यावर मधुसूदनमहाराजाच्या आणि राज्यातील सर्व प्रजेच्या आनंदाला अधिकच भरती आली.

दुसरे दिवशीं सकाळीं चंद्रशेखर माधवचा निरोप घेण्यासाठीं राजवाड्यांत त्याला भेटायला आला. त्यानें आपलें गांठोडें पाठीवर घेतलें होतें. त्याच्या हातांत त्याची नेहमीची काठी होती. माधवच्या पुढ्यांत येऊन तो त्याला म्हणाला, " दोस्ता ! तुझ्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी अखेर घडून आल्या. मला फार आनंद झाला. मी आतां जातो, मला निरोप दे. "

चंद्रशेखरचें तें बोलणें ऐकून माधवला फार दु:ख झालें. तो झटकन् पुढें आला. चंद्रशेखरला कडकडून मिठी मारून तो सद्‌गदित स्वरानें म्हणाला, " तुम्हीं जाऊं नका ! तुमच्यामुळेंच तर हा सोन्याचा दिवस मला दिसला. तुम्हीं नेहमीं आमच्याबरोबर इथं राजवाड्यांत राहून आमच्या सुखांत आणि अन् आनंदांत वांटेकरी व्हायला पाहिजे."

" नाहीं माधव. " चंद्रशेखर गंभीरपणें मान हलवून हलकेच म्हणाला, " माझी मुदत संपली. मला आतां यापुढं : रहातां येणार नाहीं. मी आतां माझं ऋण फेडून टाकलं आहे. मी कोण आहे माधव ? तूं ओळखलंस कां मला ? "

माधव गोंधळांत पडला. त्यानें नकारार्थी मान हलवली. त्यावर चंद्रशेखर हंसून म्हणाला,

" माधव, तुला तो मारुतीच्या देवळांतला मृत माणूस आठवतो कां ? त्याचे सावकार त्याची विटंबना करायला आले होते तेव्हां तूं आपल्याजवळ असलेले सारे पैसे त्या सावकारांना देऊन त्या मृत माणसाचं ऋण फेडलंस. आठवतं ना ? माधव, तो मृत माणूस

म्हणजेच मी ! तुझे मजवर जे उपकार झाले होते ते फेडण्यासाठीं मी आलों होतों. माझं काम झालं. आतां मी जातों. ”

बोलतां बोलतां चंद्रशेखर अदृश्य झाला. माधवचा गळा भरून आला. बाजूला तोंड फिरवून त्यानें हळूंच डोळ्यांतलीं आंसवें पुसलीं.

माधव आणि मधुराणी यांच्या लग्नाचा समारंभ जवळ जवळ महिनाभर चालला होता. माधवचें व मधुराणीचें एकमेकांवर प्राणांपलीकडे प्रेम होतें. मधुसूदनमहाराजांनीं राज्याचा सर्व भार आपल्या जांवयावर सोपवला आणि आपल्या छोट्या नातवंडांना खेळवीत ते मोठ्या आनंदानें म्हातारपणाचे दिवस घालवूं लागले. कालांतरानें माधव हा मधुपुरीच्या सिंहासनावर बसला आणि एक अत्यंत शूर व दयाळू राजा म्हणून चहुंकडे त्याची ख्याति झाली.



BVBK-0402834

2038

